# ब्रह्माकुमारी संस्थेने भारताची प्रतिष्ठा जगभरात पुन्हा प्रतिस्थापित करण्याचे महान कार्य केले आहे –

**– पंतप्रधान नरेंद्र मोदीजी**




**आबू रोड :** 'स्वच्छ भारत अभियान' च्या दुसऱ्या पर्वाची सुरुवात प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांनी दि. १५ सप्टेंबर २०१८ रोजी केली. त्यासाठी त्यांनी देशभरातील विभिन्न राज्यात 'वीडिओ कॉन्फेसिंग' द्वारे वार्तालाप केला आपल्या संख्येशी वार्तालाप करतांना सुरुवातीला प्रधानमंत्री मोदीजींनी स्वच्छता मिशनच्या 'ब्राण्ड ॲम्बेसेडर' राजयोगिनी दादी जानकीजींना प्रणाम करून त्यांच्या स्वास्थ्यासाठी शुभकामना व्यक्त केली. पंतप्रधान मोदीजींनी आपल्या भाषणात सांगितले की स्वच्छ भारत मिशनचे हे स्वप्न माझ्या सर्व देशवासियांच्या तसेच युवा वर्गाच्या सहयोगाने संभव होत आहे. स्वच्छता अभियान कार्यक्रमाशी ब्रह्माकुमारी संस्था संलग्न असल्याने, मी त्यांचे आभार व्यक्त करतो. **ब्रह्माकुमारी संस्थेने भारताची प्रतिष्ठा जगभरात पुन्हा प्रतिस्थापित करण्याचे महान कार्य केले आहे. आज हे कार्य प्रत्येकाच्या पुरुषार्थाने संभव होत आहे.** आपण १५ दिवसांत ५० हून अधिक ठिकाणी स्वच्छता करण्याचे जे लक्ष्य ठेवले आहे ते खरंच कौतुकास्पद आहे.

ते पुढे म्हणाले की, मला संस्थेच्या ८०व्या वार्षिक महोत्सवात आपणा सर्वांसमोर उपस्थित होण्याची संधी प्राप्त झाली होती. त्याप्रसंगी मी उर्जा संरक्षण, महिला सशक्तीकरण, कुपोषण अशा अनेक कार्यक्रमात सहयोगी बनण्याचे आवाहन केले होते. मला अतिशय आनंद होत आहे की ही गोष्ट केवळ आपण आठवणीत ठेवली नाही तर १० सूत्रीय कार्ययोजना तयार करून, त्याची अंमलबजावणी देखील सुरु केली आहे.

पंतप्रधान मोदीजी म्हणाले की, ही संस्था सदैव सामाजिक समस्यांचे समाधान करण्यात आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. तसेच स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात ब्रह्माकुमारी संस्था अग्रेसर आहे. या संस्थेच्या मुख्य प्रशासिका दादी जानकीजी देखील स्वच्छता मिशनच्या 'ब्राण्ड ॲम्बेसेडर' या नात्याने ह्या अभियानाला गती देण्यासाठी आपली भूमिका निभावत आहेत. स्वपरिवर्तनाद्वारे विश्वपरिवर्तनाचा जो आपला मार्ग आहे, हा देशभरात स्वच्छतेचे स्थायी संस्कार विकसित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावित आहे.

(वीडिओ कॉन्फ्रन्स द्वारे पंतप्रधान मोदीजींच्या भाषणानंतर वरिष्ठ राजयोग शिक्षिका बी. के गीता बहेन यांनी शांतिवन कॉन्फ्रन्स हॉलमधील हजारो ब्रह्मावत्सांना पुढील स्वच्छतेची शपथ दिली – ''आजपासून आम्ही स्वच्छतेची सुरूवात आमच्या घरापासून करू. आम्ही स्वतः स्वच्छ राहू तसेच दुसऱ्यांनाही त्यासाठी प्रेरित करू. घराच्या आसपासचे क्षेत्र देखील स्वच्छ ठेऊ. सार्वजनिक ठिकाणी कधीही मोकळ्या जागी कचरा टाकणार नाही. स्वच्छता हीच सेवा आहे, हे लक्ष्य डोळ्यापुढे ठेऊन, सर्वजण कर्म करू. तसेच दुसऱ्यांनाही अस्वच्छता वा घाण करण्यास प्रतिबंध करू.'')

परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

# अमृतकुंभ

## अंतरंग

वर्ष १२, अंक ४. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१८

## मुखपृष्ठाविषयी

दिवाळी आली की सर्वत्र आनंदच आनंद दिसू लागतो. सगळीकडे रांगोळ्या, विद्युत रोषणाई, नवीन कपडे, फटाक्यांची आतिषबाजी पहायला मिळते. दिवाळीचा सण म्हणजे जणू धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, दिवाळी (लक्ष्मीपूजन), दीपावली पाडवा (बलिप्रतिपदा) व भाऊबीज या ५ उत्सवांचे स्नेह-संमेलन आहे. परंतु या उत्सवामागे दडलेले आध्यात्मिक रहस्य न जाणून घेतल्याने, दरवर्षी दिवाळी साजरी करूनही , मनुष्याच्या जीवनात स्थायी परिवर्तन मात्र घडून येत नाही.

वास्तविक दिवाळी म्हणजे दीपोत्सव. आत्मारुपी ज्योति जागृत करण्याचा हा सण. त्यासाठी ईश्वरीय ज्ञानाचे घृत जेव्हा आत्मारुपी दीपकामध्ये पडेल तेव्हाच आत्मज्योति प्रज्वलित होईल व जीवनातील अज्ञान अंधःकार नाहीसा होईल. हाच भाव मुखपृष्ठावरील चित्रातून व्यक्त करण्यात आला आहे.

***शेवटी अमृतकुंभच्या सर्व वाचकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा! तसेच सर्वांना हे नवीन वर्ष सुख, शांती व समृद्धीचे जावो, हीच मंगलकामना!***

–प्रकाशक अमृतकुंभ




| | | |
|---|---|---|
| १) | नवरात्रोत्सव (संपादकीय) | २ |
| २) | पुरुषोत्तम संगमयुगावर प्रदीर्घकालीन दीपावलीचा शुभारंभ झाला आहे.... | ४ |
| ३) | अशी असावी ब्रह्मावत्सांची दिनचर्या | ७ |
| ४) | पंथ? नव्हे – विश्वधर्म | ८ |
| ५) | अटेंशन प्लीज | १० |
| ६) | मनोविकार (मानसिक रोग) हेच सर्व समस्यांचे मूळ कारण | १२ |
| ७) | खरा गुरु | १५ |
| ८) | सचित्र सेवावृत्त | १७ |
| ९) | संगमयुगी सर्वश्रेष्ठ भाग्य | २१ |
| १०) | परमात्म शक्ती आणि वरदानांचा अनुभव | २४ |
| ११) | कैरबियन लोकांना मी जवळून पाहिले... | २७ |
| १२) | दिवाळी करावी अशी साजरी (कविता) | ३० |
| १३) | कर्म अधिक श्रेष्ठ की भाग्य ...–भाग १ | ३१ |
| १४) | सब सौप दो, प्यारे प्रभु को (अनुभव) | ३३ |
| १५) | सचित्र सेवावृत्त | ३५ |


**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पू.)-४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८.
E-mail : info@amrutkumbh.com.

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ द्वारा :
प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे
(पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. शिवाजी चौधरी, संगणक अक्षरजुळवणी : आदिती ग्राफिक्स, उद्यमवाडी, विष्णुनगर, संभाजी पथ, ठाणे-२. मो. : ९८२१५१५०८३

**वार्षिक वर्गणी रु. ६५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/–**

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या –** www.amrutkumbh.com.



(संपादकीय)

# नवरात्रोत्सव

एकदा का भाद्रपद शुद्ध चतुर्दशीला गणेशोत्सव संपला की सर्वांचे लक्ष लागते ते नवरात्रोत्सवाकडे. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत संपूर्ण भारतात नवरात्रोत्सव साजरा होतो. आपला हा अवाढव्य देश सांस्कृतिक दृष्ट्या किती एकसंघ आहे, याची या उत्सवामुळे जाणीव होते. प्रांत-काल-परिस्थिती-नुसार हा उत्सव विविध प्रकारे साजरा केला जातो. नऊ दिवस देवीची पूजा, उपवास, जागरण, सतत तेवणारा दीपक इत्यादी रुढी वा परंपरा जपतांना स्त्री वर्गाची मोठी तारांबळ उडते. **या दिवसामध्ये देवीच्या विविध रुपांची प्रत्येक दिवशी पूजा केली जाते. त्यात देखील दुर्गा पूजेचा मान फार मोठा आहे. वास्तविक देवीची पूजा म्हणजे स्त्री शक्तीची पूजा.** हे सर्व करीत असतांना सहाजिकच हा प्रश्न उपस्थित होतो की सरस्वती, दुर्गा, लक्ष्मी.....या आदि शक्तींचा वास्तविक परिचय काय आहे? नवरात्रोत्सवात कन्यांचे पूजन का केले जाते? तसेच शक्तींचे गायन रात्रीच का केले जाते? याविषयीची समर्पक उत्तरे आपण प्रस्तुत लेखात पाहू या.

**नवरात्री संबंधी कथा व त्यांचा भावार्थ –**

नवरात्रीसंबंधी प्रामुख्याने ३ कथा प्रचलित आहेत. यातील पहिली कथा अशी आहे की मागील कल्पातील चौथ्या युगाच्या अंतिम समयी मधु व कैटभ नावाच्या दोन असुरांनी देवी-देवतांना कैदी बनवले होते. ज्यावेळी श्रीनारायणही मोह निद्रेत होते अशावेळी ब्रह्माद्वारे आदिकन्या प्रगट झाली आणि तिने श्रीनारायणाला मोहनिद्रेतून जागे केले व सर्व असुरांचा संहार करून देवतांना मुक्त केले. या कथेचा भावार्थ असा आहे की **मधु व कैटभ हे आसुरी लक्षण वा मनोविकारांचे प्रतीक आहे. मधु अर्थात मधुर व कैटभ अर्थात विक्राळ. त्यामुळे मधु नावाचा जो असुर आहे तो काम, लोभ व मोह या मनोविकारांचा प्रतीक आहे तर क्रोध व अहंकार या मनोविकारांचे प्रतीक कैटभ असुर आहे. तसेच सत्ययुगाच्या प्रारंभी जे देव-शिरोमणी 'श्री नारायण' होते, ते कलियुगाच्या अंती जन्म-जन्मांतरानंतर मोह-निद्रेत विलीन होते. अशा धर्मग्लानीच्या वेळी परमपिता शिव परमात्म्याने, त्रिदेवाद्वारे भारतातील कन्यांना ज्ञान, योग व दिव्य गुणांच्या शक्तींनी सुसज्जित केले.** त्यांना ज्ञानाचा तिसरा नेत्र प्रदान केला. तसेच सहनशीलता, दिव्यता, पवित्रता, अंतर्मुखता इत्यादी शक्तीरुपी अष्टभुजा दिल्या. याच शक्तींमुळे त्यांना 'आदिशक्ती' अथवा ''शिव शक्ती'' असे संबोधण्यात आले.

दुसरी कथा अशी आहे की महिषासुर नामक असुराने सर्व देवीदेवतांना पराजीत केले होते. त्यावेळी त्रिदेव (ब्रह्मा, विष्णु, महेश) शक्तींपासून एक कन्या आदि रुपात प्रगट झाली, जी दिव्य अस्त्र-शस्त्रांनी सुसज्जित होती. तसेच ती त्रिनेत्री व अष्टभुजाधारी होती. तिने महिषासुराचा वध केला. या कथेतील महिषासुर अर्थात महिष असुर. 'महिष' शब्दाचा अर्थ आहे 'म्हैस'. म्हैस अर्थात मंद बुद्धी,' 'अविवेक'. हे तमोगुणाचे प्रतीक आहे. पुराणात असेही वर्णन आहे की युद्ध करताना महिषासुराने सिंहाचे व हत्तीचे रुप घेतले व रेड्याच्या रुपात परत येत असतांनाच दुर्गेने त्याचा वध केला. म्हणून दुर्गा देवीच्या चित्रात महिषासुर हा रेडा किंवा असुराच्या रुपात दर्शविण्यात येतो.

तिसऱ्या कथेत असे वर्णन आहे की सूर्यवंशात शुंभ व निशुंभ असे दोन असुर जन्मले, ज्यांच्या प्रधानाचे नाव होते रक्तबिंदु व सेनापतीचे नाव होते

धूम्रलोचन. तसेच त्यांच्या सहाय्यकांची नावे होती. चंड आणि मुंड. ज्यांच्या निःपातासाठी आदिकुमारी (काली) शिवशक्ती प्रगट झाली. तिने चंड, मुंडाचा नाश केला. त्यानंतर कालिकाशक्तीने रक्तबिंदू व शुभ्रलोचन यांचा नाश केला. त्यात पुढे असेही वर्णन आहे की रक्तबिंदूच्या रक्ताच्या पडलेल्या प्रत्येक थेंबातून एक असुर निर्माण होत असे. म्हणून आदिशक्तीद्वारे त्याचा रक्तपात न करता, विनाश करविला गेला. या कथेचा भावार्थ असा आहे की आदिकुमारी अथवा शिवशक्तींनी भारतातील त्या नर-नारींना जागवले, जे सत्ययुगात देवी-देवता होते व त्यांनाच उत्साहित करून असुरी प्रवृत्तींचा समूळ नाश केला. त्या असुराचा (रक्तबिंदूचा) अंश वा बिंदू देखील राहू दिला नाही अर्थात विश्वातील आसुरीपणाचे बीजच नष्ट केले. **त्यासाठी त्यांनी सर्वांना ईश्वरीय ज्ञान प्रदान केले. म्हणूनच नवरात्रीच्या प्रारंभी 'कलश' ची स्थापना (घटस्थापना) केली जाते. तसेच आदिशक्तींनी आपल्याला अज्ञान निद्रेतून जागवले म्हणूनच भक्तजन नवरात्रीत नऊ दिवस जागरण करतात.** त्याचबरोबर आदिशक्तींकडून आत्मिक प्रकाश प्राप्त झाल्याने, नवरात्री व देवीपुढे अखंड दीप प्रज्वलित ठेवतात. मुख्य म्हणजे आदिकुमारी वा कन्यांनी हे महान कर्तव्य केले. त्यामुळे प्रत्येक वर्षी नवरात्रीत कन्यांचे पूजन केले जाते. तसेच दुर्गा मातेपुढे ही प्रार्थना करतात की -'हे अम्बे, जगदंबे, हे माते, माझी ज्योति जागव आणि मला अशी शक्ती प्रदान कर की माझ्या अंतरीचा अंधःकार मिटेल.''

### शक्तींचे गायन-वंदन रात्रीच का केले जावे?

रात्रीतच शक्तींचे गायन-वंदन करण्याची परंपरा आहे. रात्रीतच जागरण, स्मरण इत्यादी केले जाते. यामागे देखील आध्यात्मिक रहस्य आहे. वास्तविक 'रात्री' हा शब्द नेहमीच्या रात्री या शब्दाच्या वाचक नाही, जी २४ तासात एकदा येते. वास्तविक आध्यात्मिक दृष्टीने सत्ययुग व त्रेतायुगाला ब्रह्माचा दिवस असे म्हटले जाते कारण त्या काळात जन जीवनात ज्ञानाचा प्रकाश असतो. त्यावेळी मनुष्य आत्मअभिमानी व दैवीगुण संपन्न असल्याने, त्याला देवी-देवता म्हटले जाते. परंतु द्वापरयुगापासून मनुष्य देहअभिमानी बनल्याने, त्याच्यात विकारांची (असुरी प्रवृत्तींची) प्रवेशता होते. त्यामुळे द्वापर व कलियुगात दिवसेंदिवस अज्ञान अंधःकार वाढत जातो. यालाच 'ब्रह्माची रात्र' असे म्हटले जाते. कलियुगाचे अंती तर मनुष्य पूर्णता तमोप्रधान बनतो. अशा वेळी सर्व आत्मे असुरी गुणांनी पीडित, अज्ञान निद्रेत झोपलेले असतात. आत्मिक शक्ती हीन असतात. अशा वेळी परमपिता शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात अवतरित होऊन, त्यांच्या मुखाद्वारे ज्ञान देतात. हे ज्ञान ऐकल्यानंतर ते नर-नारी आपल्या जीवनात धारण करतात. त्यांनाच ब्राह्मण-ब्राह्मणी (ब्रह्मावत्स) असे म्हटले जाते. त्यातील ज्या कन्या व माता ब्रह्मचर्य व्रत धारिणी व ईश्वराला संपूर्ण समर्पित आहेत. त्यांनाच 'शिवशक्ती' असे म्हटले जाते. त्याच कलियुगाच्या अंतिम पर्वात (रात्रीत) परमात्मा शिव पित्याकडून ज्ञानशक्ती, योगशक्ती व पवित्रतेची शक्ती प्राप्त करतात. तसेच मनुष्यातील आसुरी प्रवृत्तींचा अर्थात रावणाचा नाश करतात. त्यांच्या या महान कार्याचे प्रतीक म्हणून भक्तगण रात्रीच शक्तींचे गुणगान करतात.

### वर्तमान समयाला ओळखा

आजही लोक जाणत नाहीत की वर्तमान समय हा कलियुगाचा अंतिम समय आहे. (अजूनही कलियुगाची ४० हजार वर्षे बाकी आहेत असे मानतात.) हीच ती अति धर्म ग्लानीची वेळ आहे जेव्हा सर्वत्र पापाचार, भ्रष्टाचार, हिंसाचार वाढत चालला आहे. **अशावेळी पतितपावन शिव परमात्मा पुन्हा कन्यांना ज्ञानशक्ती प्रदान करुन, मानवमात्राची आत्मिक ज्योति जागवित आहे. त्यामुळे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे की, नवरात्रीत केवळ शक्तींचा जयघोष वा कर्मकांड करण्यात आपला वेळ न घालवता, आपल्या मनात दडून बसलेल्या महिषासुर, मधु, कैटभ, रक्तबिंदू तसेच धुम्रलोचन या सर्वांचा नाश करणे. त्यासाठी ईश्वरीय ज्ञानाद्वारे आपली आत्म ज्योति जागवा.**

***



# पुरुषोत्तम संगमयुगावर प्रदीर्घकालीन दीपावलीचा शुभारंभ झाला आहे....

**ब्र. कु. उज्वलाताई, पुणे**

प्रिय आत्मिक बंधुनो, असे म्हटले जाते की, 'दसरा दिवाळी सण मोठा नाही आनंदा तोटा' परंतु हा प्राप्त होणारा आनंद अल्पकालीनच असतो. प्रदीर्घ काळासाठी असा आनंद प्राप्त व्हावा ह्यासाठी प्रदीर्घ काळाची दीपावली ही ह्या चार युगांच्या सृष्टीचक्रात असते हयाचे वास्तविक ज्ञान प्राप्त होणे आवश्यक आहे. **ह्या कलियुगाच्या अंतसमयी अर्थात पुरुषोत्तम संगमयुगावर निराकार शिव परमात्मा अवतरित होऊन, प्रजापिता ब्रह्माच्या मुखकमलाद्वारे सर्व मनुष्यआत्म्यांना दसरा, दिवाळी ह्या सणांचे आध्यात्मिक रहस्य प्रगट करून प्रदीर्घ कालीन व अलौकिक दीपावली कोणत्या दोन युगात असते व ती दीपावली कोणते मनुष्यात्मे कशाप्रकारे साजरी करतात ह्याचेही गुह्य ज्ञान सर्वज्ञ परमात्मा प्रदान करतो.** ही दिपावली केवळ काही दिवसांची, काही महिन्यांची अथवा काही वर्षांची नसून, जन्मजन्मांतराची असते ह्याविषयी मनुष्य अनभिज्ञ आहे.

दसऱ्याला हिंदी भाषेत 'विजयादशमी अथवा दशहरा' म्हटले जाते. दशहरा अर्थात दहा मस्तक असलेल्या रावणाला हरविणे किंवा नष्ट करणे आणि म्हणूनच दसऱ्याच्या दिवशी रावणाची विशाल प्रतिमा दहन करण्याची परंपरा आहे. **ह्या परंपरेचा रहस्यभेद करून परमात्म्याने म्हटले आहे की,' भारतवासी अशा रावणाचे दहन वर्षानुवर्षे करीत आले आहेत. परंतु मानवी मनातील दशमुखी रावणाचा नाश न होता, तो अधिक प्रबल होत चालला आहे.' परमात्म्याच्या महान दृष्टिकोनातून दशमुखी रावण अर्थात पाच मनोविकार स्त्रीचे व पाच मनोविकार पुरुषाचे!** असा हा चर्मचक्षुना न दिसणारा सूक्ष्म दशमुखी रावण, मानवी मनावर द्वापर युगापासून गेली २५०० वर्षे राज्य करीत आला आहे. सांप्रत समयी त्याचे साम्राज्य संपूर्ण विश्वावर आहे. मुनष्य आत्म्याचे पतन करून त्याला पापात्मा बनविण्याऱ्या अशा अकल्याणकारी माया रावणाचा नाश करावयाचा असेल तर त्यासाठी शिवपरमात्म्यानें दिलेले सत्य गीताज्ञान व त्याने शिकविलेला राजयोग आत्मसात करणे क्रमप्राप्त आहे. बंधुनो, हे त्रिकालाबाधित सत्य आहे की, जोपर्यंत काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार ह्या पांच मनोविकारांना नष्ट करून मनुष्य आत्मा त्यावर विजय प्राप्त करीत नाही, तोपर्यंत तो पावन बनू शकत नाही आणि ज्या आत्म्याने ह्या मनोविकारांच्यावर परिपूर्ण विजय प्राप्त केला आहे त्यानेच खऱ्या अर्थाने विजयादशमीचा विजयोत्सव साजरा केला आहे, असे म्हणावयास हरकत नाहीं. अर्थात ज्यावेळी मनुष्य-आत्म्यातील हे पाच मनोविकार राजयोगाद्वारे नष्ट होतात त्यावेळी त्याची आत्मज्योत पावन झाल्याने प्रज्वलित होते. जर मनोविकारांच्यावर पूर्णतः विजय प्राप्त करावयाचा असेल तर ज्योतिस्वरूप परमात्म्याद्वारे प्रकाश व शक्तींची प्रकंपने प्राप्त करणे आवश्यक आहे. म्हणून म्हटले जाते 'वो शमा बुझ नही सकती, जिसे स्वयं परमात्माने प्रज्वलित किया हो।' बंधुनो, परमात्मा अवतरित होवून केवळ एक आत्मज्योत नव्हे तर लक्ष-लक्ष आत्मज्योति प्रज्वलित करतो. **अनेकांची आत्मज्योत प्रज्वलित करणारा केवळ एक परमज्योति परमात्माच आहे. त्याचे स्मृतिचिन्ह (यादगार) म्हणून आकाशदिव्यात एकच दीप लावला**

**जातो.** बंधुनो, ज्ञानसंपन्न व आत्म-कल्याणकारी साधक त्यालाच म्हणावयाचे, जो कलियुगी नर्क निर्माण करणाऱ्या, नरकासुरावर विजय प्राप्त करुन विजयोत्सव साजरा करतो. आंतर्आम्यातील ह्या विजयोत्सवाच्या कारणे त्याची आत्मज्योत प्रज्वलित होते. स्वपुरुषार्थाने आत्मज्योत प्रज्वलित करणे, हाच वास्तविक दिपोत्सव अथवा दीपावली होय. दशमुखी रावणाचे निर्दालन झाले की, मानवमात्राची आत्मज्योत अल्पा-वधीतच प्रज्वलित होते. म्हणून विजयादशमीनंतर अल्पावधीतच दीपावली येते. बंधुनों, दसरा दिवाळीचे हे आध्यात्मिक रहस्य कालप्रवाहात लोप पावल्याने, आजचा मनुष्य आत्मज्योत प्रज्वलित न करताच, केवळ मातीच्या पणतीतील ज्योत प्रज्वलित करीत आहे. ह्याचे एकमात्र कारण हेच आहे की, त्याला स्वतःचीच अर्थात आत्म्याची पूर्णतः विस्मृति झाल्याने तो स्वतःला देह समजत आहे. वृत्तपत्रातील कोणत्याही दुष्कृत्याची बातमी वाचनात आल्यानंतर ज्ञानी तू आत्मा हाच निष्कर्ष काढतो की, हया दुष्कृत्याच्या मुळाशी कोणता तरी मनोविकारच आहे. वर्तमान समयी तर पाच विकारांनीच संपूर्ण विश्वात हाहाःकार माजवून, कलियुगी नर्काचा रौरव नर्क केला आहे. हया नर्काचे व पाच मनोविकारांचे उच्चाटन करून ह्याच साकार सृष्टीवर निर्विकारी स्वर्ग स्थापन करणे हे कार्य कोणत्याही देहधारी मनुष्याचे नसून, सर्वशक्तिवान ज्योति-स्वरुप विदेही परमात्म्याचेच आहे. हा दीपराज परमात्मा ज्ञानघृत व राजयोगाच्या अग्नीने अनेक मनुष्यांची आत्मज्योति प्रज्वलित करतो. ह्या त्याच्या महान कार्याच्या स्मृत्यर्थ दीपावलीत मातीच्या पणतींची दीपमाळ प्रज्वलित केली जाते. पणती हे देहाचे प्रतीक तर त्यातील ज्योत आत्म्याचे प्रतीक आहे. म्हणून स्वतःला देहरुपी पणती न समजता, मी ज्योति स्वरुप आत्मा, त्या ज्योतिस्वरुप परमात्म्याचे संतान आहे हा निश्चय करावा.

ज्ञानसागर परमात्मा आपल्या सर्वांना देहाभिमानासहित पाच विकारातून मुक्त करीत आहे. बंधुनो, हा देहाभिमानच पाच विकारांचे मूळ आहे. वास्तविक ह्या पाच मनोविकारांच्यामुळेच सत्ययुग त्रेतायुगात आत्माभिमानी संपूर्ण पावन व दैवी गुणांनी युक्त असलेल्या आत्म्याने अनेकानेक जन्म प्राप्त करून कालप्रवाहात व सतो, रजो, तमोच्या प्रवाहात, असुरी गुण (काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार) धारण केल्याने तो पूर्णतः पतित झाला आहे. अर्थात पूजनीय आत्माच पुजारी झाला आहे. **फलस्वरुप परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'मै कल्प कल्प (प्रत्येक ५००० वर्षांनी) अवतरित होता हूँ, तुम्हे पुजारीसे पुनःपूज्य अर्थात पूजनीय देवी देवता बनाने!'** केवळ परमात्म्याचे हे **महावाक्य लेखिकेच्या आंत र्आत्म्याला भिडणारे होते.** केवळ कलियुगाच्या अंताला पुरुषोत्तम संगमयुगावरच नरापासून श्री नारायण व नारीपासून श्री लक्ष्मी बनण्याची सुवर्णसंधी प्राप्त होते. सत्ययुग निर्माण करीत असलेल्या परमात्म्याला अत्यल्प मनुष्य आत्मेच जाणतात व तेच आत्मे ह्या विद्यालयात येऊन, देवत्वपद प्राप्त करण्याची विद्या प्राप्त करतात. फलस्वरुप मनुष्य सृष्टीच्या आदिमध्ये अर्थात श्री लक्ष्मीनारायणाच्या सत्ययुगी राज्यात केवळ नऊ लाखच दैवी भारतवासी असतात. उर्वरित सर्व आत्मे मुक्तिधाममध्ये मुक्तिच्या स्थितीत स्थित असतात. अर्थातच सत्ययुगी स्वर्गासाठी त्याना 'नो एंट्रि' असते. **सत्ययुग त्रेतायुगातील देवी देवता केवळ सात्त्विक आनंदच प्राप्त करीत असल्याने तेथे कोणतेही सण साजरे केले जात नाहीत. तेथील प्रत्येक दिवस हा दिपावली सारखाच आनंदमय असतो. बंधुनो, हीच ती प्रदीर्घ काळाची अलौकिक दीपावली होय! त्रेतायुग समाप्त होताच ही प्रदीर्घ काळाची दीपावलीही समाप्त होते.**

द्वापरयुगापासून ते कलियुगाच्या अंतापर्यंत म्हणजे जवळ जवळ २५०० वर्ष भिन्न भिन्न ऋषी मुनी, भिन्न भिन्न धर्मांचे संस्थापक, अनेक संत महात्मे व विद्वान पंडितांनी आपल्या प्रवचनाद्वारे, धर्मग्रंथाद्वारे तसेच भिन्न भिन्न प्रकारच्या आध्यात्मिक ग्रंथांची निर्मिती करून,

समाजाला ह्या मनोविकारातून अथवा षड्रिपुतून मुक्त करण्यासाठी वेळो वेळी आपला आवाज उठविला . परंतु दिवसेंदिवस मनुष्य अधिकच पतित बनत गेला. शेवटी कलियुगाचे अंती परमात्मा अवतरित होऊन, मनुष्याला पावन बनवतो व प्रदीर्घ काळाच्या दिपावलीचा शुभारंभ होतो. त्याने निर्माण केलेल्या सत्ययुग, त्रेतायुगात प्रत्येक देवात्म्याची स्थिती निर्विकारी असते; म्हणून ह्या दोन युगांना 'स्वर्गलोक' म्हटले आहे **अशा ह्या स्वर्गीय दीपावलीचा आनंद प्राप्त करावयाचा असेल तर ईश्वरीय ज्ञान व राजयोगाची प्राप्ती करणे अत्यावश्यक आहे.** राजयोग हा पतितपावन निराकार परमात्म्याशी जोडला गेला असल्यामुळे जन्मजन्मांतराची विकर्मे व कर्मबंधने सहज नष्ट होऊन, आत्म्याला पावन स्थिती प्राप्त होते अर्थात संगमयुगावर आत्म्याचे परमात्म्याद्वारे नुतनीकरण झाल्याने सत्ययुगात प्रथम जन्म प्राप्त करताना आत्म्याला नूतन (नवीन) सतोप्रधान दैवी शरीरवस्त्र प्राप्त होते. म्हणून दर वर्षीच्या दीपावलीतही नवीन वस्त्रे परिधान करण्याची परंपरा आहे. दीपावलीचा महोत्सव आरंभ होण्यापूर्वी निवास स्थानाची स्वच्छता केली जाते. परंतु आत्म्याची स्वच्छता अर्थात आत्म्यावर जन्मजन्मांतर पडलेले पाच कलंक मात्र काढून टाकले जात नाहीत. बंधुनो, परमात्म्याला हवे आहे तुमचे स्वच्छ मन! त्यासाठी आत्म्याला स्वच्छ करणे आवश्यक आहे. दीपावलीत नर्कचतुर्थीच्या दिनी अभ्यंग स्नानाला असाधारण महत्व आहे. त्याविषयी अबालवृद्धांची ही मान्यता आहे की, सूर्योदयापूर्वी स्नान केले नाही तर आत्मा स्वर्गात जाऊ शकत नाही. **ह्याविषयीचे वास्तविक ज्ञान परमात्म्याने प्रगट केले आहे की, पुरुषोत्तम संगमयुगाचा अल्पकाळ ही सत्ययुगाची पहाटच आहे. ह्या मंगलमय पहाटेला मनुष्याने आत्म्याला ज्ञान साबण व दैवी गुणांचे उटणे लावून योगकिरणांच्या शॉवरखाली अभ्यंगस्नान केले नाही तर आत्मा सत्ययुगी स्वर्गात जन्म प्राप्त करु शकणार नाही.** बंधुनो, अशा अलौकिक स्नानाद्वारे सत्ययुगी स्वर्गात अनेक जन्म प्राप्त करुन आत्मा सात्त्विक सुखांचा परिपूर्ण आनंद प्रदीर्घ काळ प्राप्त करु शकेल. आत्मकल्याणार्थ असे स्नान करणे अपरिहार्य आहे अशा ह्या स्नानानेच आत्मा पावन होतो गंगास्नानाने नव्हे!

प्रत्येक कल्पात अतिधर्मग्लानी समयी परमात्म्याचे अवतरण, अधर्माचा विनाश, एका सत्यधर्माची स्थापना, कलियुगाचा महाविनाश, सर्व मनुष्यआत्म्यांचे परमधामी प्रस्थान होणे व जशी आत्म्याची स्थिती असेल त्याप्रमाणे ह्या मानवी सृष्टिचक्रातील भिन्न भिन्न युगात भिन्न-भिन्न आत्म्यांनी शरीराद्वारे भिन्न-भिन्न जन्म प्राप्त करून आपल्या भिन्न-भिन्न भूमिका करीत राहणे, हेच ह्या विश्वाचे अंतिम सत्य आहे. हे सत्य प्रगट करणारा त्रिकालज्ञानी शिव परमात्माच आहे (शंकर नव्हे) म्हणूनच त्याला सत्यं शिवं सुंदरं (सुदरम्) म्हटले जाते. असा हा सर्वोत्तम कल्याणकारी परमात्मा, स्वतः ब्रह्मामुख कमलाद्वारे ज्ञानामृत प्रदान करीत आहे. हे ज्ञानामृत अथवा परमात्म ज्ञान प्रवाहित करण्याची सेवा चैतन्य ज्ञानगंगा (लाखो) ब्रह्माकुमारी करीत आहेत. त्यांनाच परमात्म्याने 'शिवशक्ति' म्हटले आहे. हे त्रिकालाबाधित सत्य आहे की, सर्व आत्म्यांचा उद्धारकर्ता व सद्‌गती दाता एक सद्‌गुरु परमात्माच आहे. त्या सद्‌गुरुची आज्ञा आहे की. 'मामेकं शरणं व्रज।' अर्थात मज एकट्यालाच शरण ये. त्याच्या आज्ञेनुसार आपण सर्व मनुष्यआत्मे सद्‌गुरुला शरण जाऊन, त्याने दर्शवि-लेल्या सत्यमार्गावर मार्गस्थ होण्याचा प्रयत्न करूया. **वास्तविक ह्या विश्वातील समस्त स्त्री पुरुष हे ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारीच आहेत. प्रजापिता ब्रह्माद्वारेच, परमात्मा नूतन मनुष्यसृष्टीची स्थापना करीत असल्याने ब्रह्मा हा मनुष्यसृष्टीचा अलौकिक पिता आहे. ह्या अलौकिक पित्याद्वारेच मुक्ती व जीवनमुक्ती प्रदान करून, पारलौकिक पिता परमात्मा सर्व आत्म्यांचे कल्याण करतो.**

माझ्या आत्मिक बंधुनो, अंतिम समयी अनेक साक्षात्कारांच्याद्वारे परमात्म्याला व त्याच्या महान कार्याला सर्व मनुष्यआत्मे जाणतीलच परंतु परमात्म्याला तोच आत्मा प्रिय आहे

जो ज्ञाननेत्राने त्याला योग्यवेळी यथार्थतः जाणेल. असा हा तिसरा ज्ञाननेत्र प्राप्त करून मनुष्य सृष्टीच्या आदि, मध्य व अंताचे ज्ञान प्राप्त करुन, आपण त्रिकालज्ञानी बनावे हीच त्या सद्गुरुची इच्छा आहे. सद्गुरुच्या ह्या निरपेक्ष इच्छांची पूर्ति करणे अर्थात आपले जन्मजन्मांतराचे श्रेष्ठ भाग्य बनविणे होय! अमृतकुंभच्या सर्व वाचकांनाच नव्हें तर अन्य प्रभूप्रेमींनाही प्रतिवर्षी येणाऱ्या सीमित दीपावलीसाठी व प्रदीर्घ काळाच्या दीपावलीसाठी आम्ही सर्व ब्रह्मावत्स अंतःकरणापासून शुभभावना व शुभकामना व्यक्त करीत आहोत. त्याचबरोबर हा ज्ञानबिंदू बुद्धीत ठेवावा की जो साधक डिसचार्ज झालेली आपली आत्मारुपी बॅटरी, परमात्म्याद्वारे चार्ज करेल, त्यालाच प्रदीर्घ कालीन दीपावलीचे दैवी भाग्य प्राप्त होईल. परिवर्तन सृष्टीचा अटल नियम आहे. कलियुगाच्या तमोप्रधान व अज्ञान अंधःकाराच्या काळ्याकुट्ट रात्रीनंतर सत्ययुगाची मंगल प्रभात होणे निश्चित आहे. अशा ह्या सुप्रभाती आरंभ होणाऱ्या, प्रदीर्घ काळाच्या मंगल दीपावलीचे सहर्ष स्वागत करुन, त्या मंगलमय दीपावलीसाठी स्वतःला मंगलमय मानव (देवी देवता) घडविण्याचा महान् पुरूषार्थ करु या. त्यासाठी पुढील काव्यावर मनन-चिंतन अवश्य करावे -

**ज्ञानघृताने भिजवूनी आपल्या आत्मदीपांच्या वाती । राजयोगाग्नीद्वारे सहज चेतवी शिव ह्या ज्योति।।**

**आली ही कल्पांति सुवर्ण संधी, भाग्य हेची खरोखरी । आत्मदीप उजळूनी करूया दसरा दिवाळी साजरी।।**

***

## ❖ अशी असावी ब्रह्मावत्सांची दिनचर्या ❖

१. **रोज अमृतवेळेला शक्तिशाली योगाद्वारे स्वतःला सर्व शक्तींनी भरपूर करावे.**
२. मुरली एकाग्रचित होऊन ऐकावी किंवा वाचावी.
३. मुरली ऐकल्यावर तिच्यावर विचार सागर मंथन करावे.
४. कुठल्या ना कुठल्या टॉपिक वर थोडे फार लिहावे.
५. **आत्मिक दृष्टीचा अभ्यास करावा.**
६. **दिवसभर कोणत्या ना कोणत्या श्रेष्ठ स्वमानात रहावे.**
७. रोज किमान ८ वेळा पाच स्वरूपांचा अभ्यास करावा.
८. प्रत्येक कर्म करतांना शिवबाबांच्या साथीचा अनुभव करावा.
९. भोजन योगयुक्त होऊन करावे.
१०. दिवसभरात किमान एक वेळा मुरली अवश्य रिवाइज (उजळणी) करावी.
११. संध्याकाळी (६।। ते ७।।) शक्तिशाली योग करावा.
१२. रोज सकाळी योगानंतर एक अव्यक्त मुरली वाचावी. तसेच शक्य असल्यास त्यातील भाव आपल्या शब्दात नोट करावा.
१३. रोज कमीत कमी ४ तास योगाचे लक्ष्य अवश्य ठेवावे.
१४. **दिवसभरात कुठल्याही कारणास्तव आपली स्थिती खराब होऊ देऊ नये.**
१५. रात्री झोपण्यापूर्वी दिवसभराचा चार्ट चेक करावा व शिवबाबांच्या आठवणीत झोपी जावे.
१६. **संगमयुगातील पुरुषार्थाचा समय समाप्तीच्या अति समीप आहे. त्यामुळे तीव्र पुरुषार्थ करावा. 'आता नाही तर कधीच नाही' याची जाणीव ठेवावी.**

**ब्र. कु. चंद्रशेखर, शांतिवन (आबू रोड)**



# पंथ? नव्हे – विश्वधर्म

ब्र. कु. अनुराधा, पुणे

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचा प्रारंभ कसा झाला याची काहाणी मी सांगत होते. तेव्हा त्यांच्या कडून या संस्थेसाठी पंथ हा शब्द ऐकला आणि कसंसंच वाटलं. अन् मग आठवलं की मी स्वतः सुद्धा सुरुवातीच्या दिवसात हाच शब्द या विश्व विद्यालयाबद्दल बोलताना वापरला होता! परंतु दोन महिने रोज 'मुरली' ऐकत गेल्यावर लक्षात आलं की पंथ हा शब्द फार म्हणजे फारच तोकडा आहे आणि ह्या ज्ञानाची व्याप्ती तर गगनाला गवसणी घालणारी आहे.

हे ज्ञान रोज ऐकतेय आणि तरी सतत नव काही तरी मिळत राहतं. बाबांचा शब्दांशी खेळ तरी किती सुरेख चालतो. ऐकणाऱ्या मुलांच्या लक्षात महत्त्वाची गोष्ट यावी, ती लक्षातही राहावी, यासाठी ती एक क्लुप्ति असते. ज्ञान मनोरंजक व्हावं यासाठीची युक्तिसुद्धा असते. सत्य अगदी साररुपानं सूत्रात गुंफून सांगणं असतं. कधी दोस्त होऊन मुलांनी बरोबरीनं बोलणं असतं, तर कधी कडक शिस्तीचे पंतोजी रट्टेही लगावतात! सुप्रीम टीचर सुद्धा आहे ना बाबा.

'ज्ञानमुरली' कळू लागली अन् तिची गोडी लागली की काही गोष्टी लक्षात येऊ लागतात. त्यातली एक म्हणजे बाबा 'सुप्रीम सायकॉलॉजिस्ट' सुद्धा आहेत. ज्ञानाचा मूळ उद्देशच माणसाच्या मनाची सुधारणा हा आहे. मनुष्यात्म्यांना पावन बनविणे हे तर मुख्य उद्दिष्टच आहे. त्याची बुद्धी शुद्ध करणं, विचारांना सकारात्मक वळण देणं, संकल्प – वाचा – कर्म यांची शुद्धी साधणं हाच हेतु आहे. पवित्र प्रवृत्ति मार्गाची ही वाटचाल आहे.

द्वापरयुगापासून आदि सनातन देवीदेवता धर्म लोप होत गेला. कारण मुनष्य आपलं देवत्व घालवून बसला . निम्म्या कला कमी झाल्याचा तो परिणाम होता. **काल चक्राचा त्याच्याशी संबंध होता हे खरंच. सिंधु नदीच्या काठावरची संस्कृती म्हणून आपल्याला हिंदू हे नाव मिळालं आणि देश झाला हिंदुस्थान तसेच आपला धर्म ही झाला हिंदू धर्म.** एकीकडे तो ही बिघडत गेला तरी संन्यासी–सत्पुरुष–सच्चरित्रवान लोकांमुळे पवित्रता राखली गेली. म्हणूनच या कलियुगात सुद्धा गेल्या शतकात स्वामी विवेकानंदांनी पाश्चिमात्य देशात ठणकावून सांगितलं की 'जगात विश्वधर्म होण्याच्या पात्रतेचा जर कुठला धर्म असेल तर तो माझा हिंदूधर्मच.' **तर मग या विश्वविद्यालयात येऊन आपण जे काही शिकतो ती तर अतिशुद्ध अशा आदि सनातन देवी देवता धर्माची पायाभूत तत्व आहेत. ती इथे अंगी बाणली, धारण केली म्हणजे सत्ययुगात आपण त्यांचं स्वरुपच बनतो. हा खरा खरा विश्वधर्म आहे, विशुद्ध विश्वधर्म.** याचं प्रत्यंतर येतच आहे. साऱ्या जगात तो पसरतोय. वेगवेगळ्या वंशांचे, निरनिराळ्या धर्माचे आत्मे यामधे सामील होताहेत. त्याचं कारण आहे त्याची मूलगामी व्यापकता हेच.

कोणी म्हणेल भौतिक शास्त्रांची व्यापकता काय कमी आहे? पण मुख्य फरक हा की ती शास्त्र शेवटी जड तत्वांचा वा दृश्य जगताचा अभ्यास करणारी असतात आणि त्या भौतिक ज्ञानाला हे ईश्वरीय ज्ञान नाकारतं थोडंच?

परंतु पंचतत्त्वांचा अभ्यासाची सीमा संपते, त्यापुढे या ज्ञानाचा प्रदेश चालू होतो. हे ज्ञान आपल्याला आजवर अज्ञात अशा 'सूक्ष्म वतन', 'मूल वतन' याविषयी सांगते. ते भौतिक ज्ञानाच्या पलीकडचे पाहते. स्थूलासह सूक्ष्म आणि त्याही पलिकडच्या अतिसूक्ष्माचं

दर्शनच नव्हे तर त्याचा अनुभव करुन देणारं हे ज्ञान आहे. म्हणून त्याची व्याप्ति शब्दातीत आहे.

अन् ते शब्दांद्वारेच समजावून देणारा कोण तर प्रत्यक्ष परमेश्वर. परमात्मा, सुप्रीम सोल. हे ज्ञान मिळविण्यासाठी पहिला धडा शिकायचा तो आत्मरुपाचा. पुढची पायरी परमात्म रुप जाणण्याची. तिसरी पायरी परमात्म रुपाच्या प्रचीतीची. त्यासाठी अंधश्रद्धेची हातातली काठी फेकून द्यावी लागते आणि परमात्म प्रीती व योग यांचे पंख लावावे लागतात. मुळात परमात्मप्रीतीचं बीज मनात असेल तरच इकडे वळण्याची बुद्धी होते. परंतु ते प्रेम आता ज्ञानासह असल्याने बलवान होते. मग आत्मा उडण्याची कला शिकला की या ज्ञानाची प्रचीती येऊ लागते. सकारात्मकता हे याचं एक झळकणारं वैशिष्ट्य. दुसरं समदृष्टी, हे याचं तळपणारं वैभव. (आत्मिक दृष्टीमुळे हा समभाव येतो.) देवत्वाकडे नेणारं हे ज्ञान, कलियुगी पतित मनुष्यआत्म्याला लागलेले अंधश्रद्धा आणि विषमता - विषमबुद्धी हे दोन्ही पक्के झालेले डाग धुवून टाकणारं हे ज्ञान आहे. ते स्थूल लोकातल्या (आपल्या या जगातल्या) अज्ञानी विचारांना, पतित गोष्टीना पावन बनवणारं आहे. सुधारणारं आहे. ही ह्या ज्ञानाची महती.

हे असं ज्ञान, राजयोग ज्या चार स्तंभांवर उभा आहे त्यापैकी एक स्तंभ आहे. जर याच्या फार गहनतेत जायचं नसेल तर फक्त 'मी आत्मा, माझा बाबा परमात्मा, बाकी सर्वजण ही आत्मेच; सर्वांचं घर एकच-परमधाम; तिथे पावन होऊन जाण्यासाठी आपण चांगलं आणि चांगलंच वागायचं' हे एकच मर्म सुद्धा पुरेसे आहे. इतकं सोपं करून शिवबाबा सांगतात. ते त्यांच्या लाडक्या मुलांना कळतं जे निरक्षर सुद्धा असू शकतात, अन् तेच त्याना अधिक प्रिय आहेत. विद्वत्तेचं ओझं बाळगणाऱ्यांना ते ओझं फेकून देणं कठीण असतं. वेळ लागतो. यांची पाटी कोरी. तिच्यावरती मुळाक्षरं, धुळाक्षरं होऊन उमटली तरी ती लगेच ठळक नि पक्की होतात.

योग हा या चार स्तंभांपैकी प्रमुख स्तंभ. वर सांगितलेलं ज्ञानाचं सार हे इतकं बलशाली आहे की तेवढ्या पायावर सुद्धा योगाचा मजबूत मजला उभा राहू शकतो. योग एकाग्रतेनं होत राहिला, शिवबाबांशी तार जुळत राहिली, शक्ती मिळत राहिली तर विद्यार्थी उत्तम गुण मिळवून पास होतो. ''हड्डी सेवा'' अतिशय फलदायक आहे. परंतु ती ज्यांना जमणारी नाही, अशांनी दुप्पट चौपट 'मनसा सेवा' केली पाहिजे. ही वरचेवर अधिकाधिक प्रभावी रितीनं करण्याची आवश्यकता शिवबाबा सतत सांगतात. गृहस्थ व्यवहारात असणाऱ्या ब्राह्मणांसाठी ही सेवा करणं, फारच उपयुक्त. त्यातून स्व ची सेवा सुद्धा साधते. मग इतरांचीही होते.

पण या सर्वांच्या मुळाशी लागते ती दिव्य गुणांची धारणा. या विश्वधर्माचं हे फार महत्त्वाचं अंग आहे.

तेव्हा अशा चार अंगांत सामावलेला हा दिव्य विश्वधर्म प्रत्यक्ष वर्तणुकीत आणला असता, विश्वाला पावन बनविणारा ठरतो. पवित्रतेची धारणा ही इथे अत्यंत महत्वाची आहे.

ही सर्व धारणा, नवीन आलेल्यांना कठीण वाटते. सारे तर या ज्ञानात येणार नाहीत हे उघडच आहे. परंतु जे निष्ठेनं धारणा करतात नि चारी विषयात गुण मिळवितात, वर्तणुकीत बदल घडवितात अशांची एक विशिष्ट संख्या तयार झाली की विश्वपरिवर्तनाला गति मिळणार आहे.

ते 'महाभारी' महाभारत युद्ध त्या नैसर्गिक आपत्ति, ते सृष्टीची शुद्धि करणारं विनाशपर्व संपलं की - मग उघडणार आहेत स्वर्गाची, सत्ययुगाची सुवर्णद्वारं. पावन मन, पावन तन, पावन धन, पावन सृष्टी - काय विचारावं त्या जगताचं सौंदर्य!

ती सुखाची परमावधि आहे.

परंतु त्यापेक्षाही श्रेष्ठ आहे ह्या संगमयुगात मिळणारं परमात्म मीलनाचं सुख. त्या ईश्वरीय ज्ञानाचं या जगातलं प्रत्यक्ष फळ आहे इंद्रियातीत सर्वोच्च आनंद. त्या आनंदाकडे आपल्याला बोटाला धरुन नेणारे शिवबाबा - त्यांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत. शेवटी मी हेच म्हणेन-

**उपकार तुम्हारा बाबा किन शब्दों में गाऊँ।**

**इस दिलने जो पाया है वो कैसे मैं समझाऊँ।।**

***



# अटेंशन प्लीज

ब्र. कु. लतिका, ठाणे(प.)

संगणकावर काम करताना प्रामुख्याने तीन गोष्टी पहायला मिळतात. १) 'इनपुट' (पुरविलेली माहिती) २) प्रोसेसिंग ( विशेष प्रक्रिया) ३) 'औट पुट' (मिळणारे फलित वा परिणाम). याच तीन क्रिया आपल्याद्वारे देखील सतत घडत असतात. आपण हे जाणतो की आत्म्याच्या मुख्य तीन शक्ती आहेत- १) मन २) बुद्धी व ३) संस्कार प्रामुख्याने संस्कारानुसार मनात संकल्प उत्पन्न होत असतात. तसेच संस्कार हे आत्म्याच्या पूर्वकर्मानुसार, संगतीनुसार, ज्ञानानुसार, गुणांच्या धारणेनुसार - बनतात. मनात उत्पन्न होणाऱ्या संकल्पांना अथवा स्मृतीला जोड मिळते ती आपल्या वृत्तीची अर्थात भावनांची, अशा तऱ्हेने स्मृती व वृत्ती या मूलभूत दोन गोष्ट आहेत, ज्या मनात कायम उत्पन्न होत असतात यालाच आपण आत्मारुपी संगणकाला पुरविण्यात आलेले 'इनपुट' (पुरविलेली माहिती) म्हणू या. त्यानंतर ती बुद्धीरुपी प्रोसेसरकडे पुरविण्यात येते. बुद्धीरुपी प्रोसेसर ज्या गुणवत्तेचा (Quality) असेल त्यानुसार शरीररुपी इंद्रियांद्वारे दृष्टी, बोल व कर्म यांची अभिव्यक्ती (औटपुट) होते. जसा संगणकाद्वारे अंतिम परिणाम बाहेर पडतो, त्यावरुन संगणकाची कार्यक्षमता ठरविण्यात येते. तसेच आत्म्याच्या कर्मानुसार त्याची गुणवत्ता ठरवली जाते.

आपण पहातो की संगणकाच्या 'इनपुट' ला जितके महत्त्व आहे तितकेच प्रोसेसरला आहे व तितकेच महत्त्व 'फायनल औटपुट' देणाऱ्या (प्रिंटरला, मॉनिटरला, स्पीकर्स इ.) यांना देखील आहे. तसेच आपले जीवन श्रेष्ठ बनवायचे असेल तर मन, बुद्धी व संस्कार या तिन्ही गोष्टी श्रेष्ठ असणे आवश्यक आहे. वरील उदाहरणात आपण पाहिले की मूलभूत पुरविलेल्या माहितीत (इनपुट) आपल्या पूर्व संस्कारांची मुख्य भूमिका आहे. त्यासाठी शिवबाबांनी सांगितले आहे ''तुमचे पूर्व संस्कार ही रावणाची प्रॉपर्टी आहे. ती त्याला परत देऊन टाका व **सदैव लक्षात ठेवा की शिवबाबांचे जे संस्कार आहेत, तेच तुमचे संस्कार आहेत.'' शिवबाबांचे संस्कार आहेत- विश्व कल्याणकारी, शुभ भावना व शुभकामना धारी. हे जर सदा इमर्ज (प्रकट) रुपात असतील तर कधीही मनात अशुभ संकल्प उत्पन्न होणार नाहीत.** परंतु जर काही चांगले शिव बाबांचे संस्कार व काही स्वतःचे पूर्व संस्कार इमर्ज (प्रकट) असतील तर दोन्ही मिक्स झाल्याने, खिटपीट होत राहिल. त्यामुळे जरासुद्धा पूर्व संस्कार अर्थात रावणाची प्रॉपर्टी आपल्याकडे ठेऊ नका. फलस्वरुप ब्राह्मण जीवनात आपला प्रत्येक संकल्प हा श्रीमतानुसार असेल.

त्यानंतर बुद्धी रुपी जो आत्म्याचा प्रोसेसर आहे. तो देखील चांगल्या गुणवत्तेचा असला पाहिजे. त्यासाठी शिवबाबा प्रत्येक ब्रह्मावत्साला जन्मताच दिव्य बुद्धीचे वरदान देतात. हे वरदान सदैव लक्षात ठेवा. त्याचबरोबर अंतिम परिणाम (फायनल औटपुट) देणारी जी इंद्रिये आहेत. ती देखील सुस्थितीत असली पाहिजेत. अंतिम परिणाम देणारी इंद्रिये आहेत. १) डोळे (कमलनयन २) मुख (मुखकमल) ३) स्थूल कर्मेंद्रिय (हस्त कमल, पादकमल) त्यांच्याद्वारे सुद्धा दिव्यता प्रकट झाली पाहिजे. ते कमलपुष्पासमान पवित्र बनले पाहिजेत. तरच खऱ्या अर्थी आत्मारुपी संगणक

योग्य रीतीने कार्य करीत आहे, असे म्हणता येईल .

**तात्पर्य म्हणजे आम्याची पाचही मुखे –स्मृती, वृत्ती, दृष्टी, बोल व कर्म ही जेव्हा श्रेष्ठ बनतील तेव्हा आपल्याद्वारे बापदादांची प्रत्यक्षता होईल. याचेच गायन भक्तिमार्गात केले जाते 'पाचामुखी परमेश्वर'. तसेच भक्तिमार्गात महावीर हनुमानाला पाच मुखेही दाखविली जातात. यावरुन आपल्या लक्षात आले असेल की आपल्या पाचही मुखाद्वारे सदैव बापसमान श्रेष्ठ कार्य करीत रहाणे, हीच वास्तविक अंतिम सर्वश्रेष्ठ सेवा आहे.**

समजा तुम्ही आत्मारुपी संगणकाला दिलेले 'इनपुट' बरोबर आहे. अर्थात तुमची स्मृती व वृत्ती ठीक आहे. परंतु जर तुमच्या बुद्धीरुपी प्रोसेसर ठीक नसेल तर तुमच्याद्वारे होणारी अभिव्यक्ती (दृष्टी, बोल व कर्म) योग्य नसेल. बऱ्याच वेळा असेही होते की तुमचे 'इनपुट' व 'प्रोसेसर; दोन्ही ठीक आहेत अर्थात तुमचे मन व बुद्धी ठीक आहेत. परंतु तुमची 'औटपुट' (अंतिम परिणाम) देणारी जी इंद्रिये आहेत तीच योग्यरीतीने काम करीत नाहीत. ती व्यर्थ गोष्टीत व्यस्त आहेत. तरी देखील 'औटपुट' योग्य ते येणार नाही. उदा. कॉम्पुटरचा प्रिंटर जरी ठीक नसेल तरी त्याचा उपयोग होणार नाही. तात्पर्य म्हणजे उत्कृष्ट प्रतीचा संगणक कुठला? तर ज्याचे सर्व पार्टस् उत्तम रीतीने चालत आहेत. त्याप्रमाणे श्रेष्ठ आत्मा व साधक कोणाला म्हणावे? ज्याची सर्व अंगे (मन, बुद्धी, संस्कार, पंच ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये) उत्तम प्रकारे कार्य करतात. संगमयुगात जेव्हा सातत्याने आपण दिव्य दृष्टी, दिव्य बोल व दिव्य कर्मे करीत जातो तेव्हाच आपले संस्कार दिव्य बनत जातात. फलस्वरूप या दिव्य संस्कारांच्या आधारेच संपूर्ण कल्पासाठी आपण सृष्टिनाटकात हिरो-हिरॉइनची भूमिका बजावतो.

**पिताश्री ब्रह्माबाबांच्या जीवनाला देखील शिवबाबांनी एका अव्यक्त वाणीत संगणकाची उपमा दिली आहे. कारण त्यांच्या अलौकिक जीवनापासून सर्व प्रश्नांची (दृष्टी कशी असावी? बोल कसे असावे?....) अचूक उत्तरे मिळतात.** त्यांची दृष्टी सदैव आत्मिक व कल्याणकारी होती. त्यांचा प्रत्येक बोल वरदानी होता. त्यांचे प्रत्येक कार्य समर्थ, विश्वकल्याणकारी, शुभभावना व शुभकामना संपन्न होते. याला मुख्य कारण म्हणजे शिवबाबांनी त्यांना जो स्वमान दिला होता- प्रजापिता, आदि पिता, ग्रेट ग्रेट ग्रँड फादर... यांचे ते एक सेकंदात स्वरुप बनले होते. आपल्याला सुद्धा शिवबाबा 'बापसमान भव' हे वरदान देत आहेत. त्याचे आपण स्वरुप बनू या. फलस्वरुप आपली स्मृती, वृत्ती, दृष्टी, बोल व कर्म सदैव बापसमान बनेल. त्यासाठी आवश्यक आहे- स्वतःवर सदैव अटेंशन. हीच खरी साधना वा ध्यान आहे. अशाप्रकारे सदैव अटेंशन ठेवण्यासाठी शिवबाबा सांगतात. 'मुलांनों अंतर्मुखी बना.' अंतर्मुखतेद्वारेच अव्यक्त वा अकारी स्थिती सहजच प्राप्त होते व या स्थितीत आपली स्मृती, वृत्ती, दृष्टी, बोल व कर्म या पाचही गोष्टी बापसमान असतात.

एखादी ब्रह्मावास जेव्हा संदलीवर योगासाठी वा मुरली वाचनासाठी बसतो तेव्हा त्याचे आत्मिक स्थितीकडे अटेंशन असते. फलस्वरुप त्याचा परिणाम समोरच्यांवर चांगला होवो. परंतु जेव्हा तो संदलीवरून खाली उतरतो व कार्य व्यवहारात येतो. त्यावेळी त्याचे आत्मिक स्थितीकडे तितकेसे अटेंशन रहात नाही. बऱ्याचदा त्यांच्यात पुन्हा देहअभिमान (अहम् आणि वहम्) जागृत होतो व अयोग्य वर्तन घडते किंवा दिव्यतासंपन्न कर्म घडत नाही. असे आपल्या हातून होऊ नये, असे वाटत असेल तर त्यावर एकच उपाय म्हणजे 'अटेंशन प्लीज' कधी-कधी शिवबाबा गंमतीने सांगतात की 'अटेंशन चा स्क्रू टाइट करा.' समयानुसार आपण प्रत्येकाने अटेंशनचा स्क्रू टाइट करण्याची आवश्यकता आहे.

**जसे लौकिक मिलीट्रीमध्ये अटेंशन (सावधान) हा शब्द अतिशय महत्त्वपूर्ण आहे 'परेड सावधान!' अशी ऑर्डर दिल्यानंतरच पुढील क्रिया केली जाते. त्यामुळे त्यांच्या कार्यात सुसंगता व श्रेष्ठता दिसून येते. त्याप्रमाणे या रुहानी (आत्मिक) मिलीट्रीमध्ये सुद्धा**

**पान क्र. ३४ वर**




# मनोविकार (मानसिक रोग) हेच सर्व समस्यांचे मूळ कारण

ब्र. कु. भगवानभाई, शांतिबन (आबू रोड)

आज समाजातील प्रत्येक वर्ग सतत तणावाखाली वावरतांना दिसतो. विद्यार्थी वर्गाला शालेय अभ्यासाचा व परीक्षेचा ताण, प्रौढ वर्गाला घरदार, नोकरी वा व्यवसाय सांभाळतांना होणारा ताण, आजोबा, आजींना एकटेपणाचा व आजारपणाचा ताण, मानव निर्मित समस्या व प्राकृतिक समस्या यातून उद्‌भवणारा ताण दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. परिणामता मनाचे आरोग्य धोक्यात आले आहे. मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्याने, शारिरीक आरोग्यदेखील धोक्यात आले आहे. आज बहुतांशी लोक शारीरिक आरोग्या विषयी जागरुक आहेत. परंतु त्याला मानसिक आरोग्याची सांगड नसल्यामुळे, मनोविकारांचे (मानसिक रोगांचे) प्रमाण जगभर वाढत चालले आहे. जगाच्या पाठीवर अनेक पशु-पक्षी, प्राणी इत्यादी आहेत त्यांनी कसेही वागले तरी चालते. परंतु माणसांसाठी समाजाने काही नितिमूल्ये ठरवून दिली आहेत. त्यानुसारच समाजात वागावे लागते. मनुष्य जेव्हा ती नीतिमूल्ये पायदळी तुडवतो तेव्हा मात्र समाज त्याचा धिक्कार करतो. यातूनही मानसिक तणाव वाढतो. परिणामतः मानसिक रोगाचे प्रमाण वाढत चालले आहे

जगभरात आज सुमारे ५५ कोटी लोक हे मनोविकाराने ग्रस्त असल्याचे आढळून आले आहे. **बंगलूर येथील नॅशनल इस्टिटयूट ऑफ मेन्टल हेल्थ अॅन्ड न्युरो सायन्स' या संस्थेने केलेल्या एका सर्वेक्षणात भारतात ११ व्यक्तीं-पैकी एक व्यक्ती मनोविकाराने ग्रस्त असल्याचे आढळून आले आहे.** यावरुन हे स्पष्ट होते की मनोविकारी रुग्णांचे आपल्या देशातील प्रमाण ९% आहे.

**मनोविकारांचे कारण व परिणाम :**

मन हे फार चंचल आहे. त्यामुळे त्याला वेगवान घोड्याची उपाय दिली जाते. मनरुपी घोड्याला आवरणे, हे कधी-कधी आत्मारुपी घोडेस्वाराला अशक्य होऊन जाते. अशा चंचल मनाचे वर्णन संत बहिणाबाईंनी अतिशय सुंदर शब्दात केले आहे.

**मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर।**
**आता होतं भुईवर, गेलं गेलं आभाळात।।**

मनाला पंख फुटले की ते कुठेही भरारी मारते. स्वामी समर्थ रामदासांनी तर मनाची चंचल वृत्ती पुढील शब्दात वर्णन केली आहे.

**चपळपण मनाचे मोडिता मोडवेना।**
**सकळ स्वजन माया तोडिता तोडवेना।।**
**घडि घडि बिघडे हा निश्चयो अंतरीचा।**
**म्हणवूनि करुणा हे बोलतो दीनवाचा।**

मनाच्या चंचलतेचा परिणाम काय होतो, हे आपण सर्वजण जाणतो. मनावर नियंत्रण नसल्यामुळेंच कर्मेंद्रियांद्वारे वाईट कर्म होतात. परिणामतः अपरिमित दुःख भोगावे लागते. सध्याच्या विज्ञान युगात जीवघेणी स्पर्धा, बेकारी, महागाई, आर्थिक असुरक्षितता, व्यवसायातील अस्थिरता, विभक्त कुटुंब पद्धती या अनेक कारणांमुळे मनावर सतत तणाव असतो. ज्यातून मनोविकार उद्‌भवतात. कित्येकदा असेही दिसून येते की मानसिक रोग प्रामुख्याने नकारात्मक विचारांमुळे वाढीस लागतात. उदा. एखाद्या व्यक्तीविषयी आपल्याला पुरेशी माहिती नसतांना, दुसऱ्यांनी सांगितलेल्या महितीच्या आधारे त्या व्यक्तीविषयी आपण नकारात्मक दृष्टिकोन बाळगतो परिणामतः त्याच्याशी अयोग्य वर्तन करतो. कधी कुणी आपला अपमान केला तर त्याचे वारंवार चिंतन करुन, मनाला दुःखी

करतो. एखाद्या प्रसंगी अपयश आले तर फार खचून जातो. कुणी स्वतःच्या नशीबालाच दोष देत बसतो. तसेच घरातील भांडण-तंटे अशा अनेक छोट्या-मोठ्या कारणामुळे आपली मानसिकता आपण स्वतःच दुर्बळ करून टाकतो. यातूनच पुढे मानसिक रोगांचा प्रादुर्भाव मोडतात.

**मानसिक रोग प्रामुख्याने दोन प्रकारात मोडतात :**

**१) मज्जाविकृती –** यामध्ये चिंतारोग, नैराश्य, निद्रानाश, व्यसनाधिनता, लैंगिक समस्या इत्यादींचा समावेश होतो.

**२) चित्त विकृती –** याचे स्वरुप खूप तीव्र असते. यामध्ये रुग्णाची स्थिती एखाद्या भ्रमिष्ठासारखी होते. त्याला वेगळेच काही दिसू लागते. ऐकू येऊ लागते. असे अनेक भ्रम होऊ लागतात.

**मनाच्या विभिन्न अवस्था :**

योगाशास्त्रात मनाचे ५ प्रकार प्रकार सांगितले आहेत. ते आपण थोडक्यात पाहू या.

**१) मुढ चित्त –** ज्या मनावर अज्ञानाचे प्रभुत्त्व असते. ज्ञानाच्या अभावामुळे अशी व्यक्ती मनोनिग्रह करु शकत नाही.

**२) क्षिप्त चित्त –** जे ज्ञानेद्रियाच्या विषयाकडे सतत आकर्षित होत असते, त्याला क्षिप्त चित्त असे म्हणतात. उदा. चांगले संगीत ऐकणे, सुंदर गोष्टी बघणे, रुचकर पदार्थांचे सेवन करण्याची इच्छा करणे. यालाच मनाची अस्थायी वृत्ती म्हटले जाते. ज्यामुळे मन एकाग्र होऊ शकत नाही.

**३) विक्षिप्त चित्त –** मनाला अल्पकाळाचा विरंगुळा मिळाला की ते दुसऱ्या विषयाकडे आकर्षित होते. जेव्हा मनाचे लक्ष्य निर्धारित नसेल तेव्हा मन एखाद्या विशिष्ट दिशेला न जाता. ते सारखे दिशा बदलत असते. तात्पर्य म्हणजे मन भिन्न-भिन्न विषयाकडे आकर्षित होत असतो.

**४) एकाग्र चित्त –** जे मन एखाद्या विशिष्ट विषयावर एकाग्र होऊ शकते, त्याला एकाग्र चित्त असे म्हणतात. एखादा संगतीकार संगीतावर, चित्रकार चित्रावर, राजयोगी परमात्म्यावर एकाग्र चित्त होऊ शकतो.

**५) निरुद्ध चित्त –** मनाची सर्वोत्तम अंतिम अवस्था म्हणजे निरुद्ध चित्त. या अवस्थेत कोणतेही विकार मनाला स्पर्श करु शकत नाहीत. अशा अवस्थेत मनाची ओढ एक परमात्म्याकडे लागलेली असते. परमेश्वराच्या सुंदर स्वरुपाला बघणे, त्याच्याशी कम्बाइण्ड (एकत्रित) स्थितीचा अनुभव घेणे, या एकाच ध्येयाकडे मन झेपावते.

**मानसिक रोगावर राजयोगाद्वारे होणारे लाभ –**

ज्याप्रमाणे डोळ्यात जरासा कचरा गेला तरी आपल्याला किती त्रास होतो. त्याचप्रमाणे आपल्या मनामध्ये सुद्धा जर नकारात्मक विचार, वासना, राग, द्वेष, मत्सर, इत्यादी विकारांचा कचरा गेला तर कमी अधिक प्रमाणात मानसिक रोग उद्‌भवतात. **अशा या मनातील कचऱ्याची सफाई करण्याचे सहज साधन आहे. -राजयोगाचा नियमित अभ्यास. राजयोगाचा अभ्यास केल्याने मज्जा विकृती असणारे मनोरुग्ण लवकर बरे होतात.** मुख्य म्हणजे मानसिक तणाव जो या रोगाचे मुख्य कारण आहे, त्यातून रोगी मुक्त होतात. अनिद्रेपासून पिडीत असणाऱ्यांसाठी राजयोगाचा अभ्यास अतिशय लाभकारी आहे. योगाभ्यासामुळे मेंदूला आराम प्राप्त होतो आणि मानसिक तणाव दूर करण्यासाठी मदत होते. माणसाचा स्वभाव शांतीप्रिय बनत जातो. त्याच्यातील चिडखोरपणा, क्रोध, बदला घेण्याची भावना, ईर्ष्या, द्वेष इत्यादी मनोविकार कमी होत जातात. त्याचे जीवन निश्चिंत बनत जाते. परिणामतः त्याला झोपही शांत लागते. राजयोगाचा अभ्यासी हा स्वतःला निमित्त समजतो आणि कर्ता-करविता शिवबाबा आहे, असे समजतो. त्यामुळे त्याच्या जीवनात सदैव निश्चिंतता असते. त्यामुळे तो सर्व प्रकारच्या मानसिक रोगांपासून आपोआपच दूर असतो.

**दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे राजयोगीचे जीवन ईश्वरीय अविनाशी ज्ञान, गुण व शक्तींनी सदा भरपूर असल्याने, त्याचे चित्त सदैव प्रसन्न असते. जेथे चित्ताची प्रसन्नता असते तेथे मानसिक रोगाची अविद्या असते.**

**तो आपल्या मनात सदैव एकच गीत असतो–**

**बाबा, आपने कमाल कर दिया।**
**हमारा सार जीवन, आपने खुशहाल कर दिया।।**

राजयोगाच्या अभ्यासाने इच्छा-शक्ती (विल पॉवर) प्रबल होते. त्यामुळे वाईट सवयी, व्यसन, विकार यांच्यावर सहज नियंत्रण ठेवता येते. मुख्य म्हणजे थोड्याशा कालावधीतच जीवनात परिवर्तन दिसून येते आणि मानव देवतातुल्य बनतो. याचेच आजही गायन केले जाते– 'नर ऐसी करनी करे, जो नर से श्री नारायण बने। नारी ऐसी करनी करे जो नारी से श्रीलक्ष्मी बने।

तात्पर्य म्हणजे राजयोग ही मनाला सदा स्वस्थ ठेवणारी परम औषधी आहे. आपल्या मनाला सदैव स्वस्थ ठेवण्या-साठी पुढील १६ सूत्रे सदैव लक्षात ठेवा.

१) मनाचे दमन करु नका. त्याला सुमन बनवा. त्यासाठी मनाला श्रेष्ठ विचारांचा खुराक देऊन शक्तिशाली बनवा.

२) स्वतःला हर्षित ठेवण्यासाठी केवळ त्यांचाच संग करा, जे स्वतः प्रसन्नतेने भरपूर आहेत.

३) **कुणाची कमी–कमजोरी कधी पाहू नका. दुसऱ्यांचे केवळ गुण पहा व ते धारण करा.**

४) पवित्र, शुद्ध विचार हेच स्वस्थ मनाचे भोजन आहे. त्यामुळे नेहमी पवित्र विचार मनाला देत जा. पवित्र विचार हेच आपल्या जीवनातील अमूल्य धन आहे.

५) प्रसन्नता हाच स्वस्थ मनाचा आधार आहे. स्वस्थ मनामुळेच आपले शरीरही सदैव स्वस्थ रहाते.

६) आपल्या सर्व इच्छा ईश्वरावर केंद्रीत करा म्हणजे कोणीही आपल्याला निराश करु शकणार नाही.

७) **सदैव स्वमानात राहून सर्वांना सन्मान देत रहा म्हणजे स्वतःला सुद्धा सन्मान मिळत राहिल. स्वमानामध्ये राहिल्याने अपमानाची जाणीव कधी होत नाही. अपमानजनक परिस्थिती हेच मनाला रोगी बनविण्याचे मूळ कारण असते.**

८) नेहमी शांतीचा स्वधर्मात टिकण्याचा प्रयत्न करा तरच मनोबल सदैव मजबूत व शक्तिशाली बनत जाईल.

९) **सदा अंतर्मुखी स्थितीत राहून आत्मचिंतन या परमात्म चिंतन करा. अंतर्मुखी बनणे, हाच शांतीचा खरा मार्ग आहे. त्यामुळे संसारातील व्यक्ती, वस्तू, वैभव यांच्यापासून विरक्ती प्राप्त होईल.**

१०) जीवनातील समस्या व परिस्थिती यांना उन्नतीचे साधन समजून, त्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन बाळगून, व्यर्थ विचारांपासून मुक्त बना.

११) अपमान वा निंदा यांना फुलांचा गुलदस्ता समजून, त्याचा स्वीकार करा म्हणजे मन सदैव प्रसन्न राहिल.

१२) विकारांवर विजय प्राप्त करणे, हाच सर्वात मोठा विजय आहे, हे सदैव लक्षात ठेवा. हेच मनाला निरोगी ठेवण्याचे साधन आहे.

१३) **आपले मन ईश्वराच्या स्वाधीन करा. जेव्हा मनरुपी घोड्याचा लगाम परमात्म्याच्या हाती द्याल,** तेव्हाच मन निरोगी बनू शकते.

१४) आपल्या मनातील प्रत्येक विचाराकडे लक्ष द्या. जेव्हा मनाला शुद्ध संकल्पाचे भोजन देत रहाल. तेव्हाच मन निरोगी राहिल.

१५) **परमत, परचिंतन व परदर्शन यापासून सदैव मुक्त रहा व परोपकारी बना. केवळ दुसऱ्यांच्या विशेषतांचे चिंतन करा म्हणजे मन सदैव निरोगी राहिल.**

१६) रोज ईश्वरीय महावाक्यांचे श्रवण वा वाचन तसेच परमात्मा पित्याची आठवण करा. यांच्याद्वारेच मनोबल वाढते आणि आत्मजागृती होते. त्याचबरोबर स्वतःला तसेच दुसऱ्यांना आत्मा समजून चालल्यानेच, मन सदैव निरोगी राहू शकते.

**अशाप्रकारे वर्तमान समयी आपल्या जीवनातील सर्व समस्या अथवा परिस्थितीचे मूळ कारण आहे, आपले कमजोर मन. या कमजोर मनाला राजयोगाच्या अभ्यासाने मजबूत बनवा. तरच आपण मानसिक व शारीरिक आजारापासून दूर राहू शकतो.** इतकेच नव्हे तर आपण वातावरणामध्ये सुद्धा शांती व शक्तीची प्रकंपने पसरवू शकतो. मनाला जिंकण्यामुळेच आपण जग सुद्धा जिंकू शकतो. **म्हणूनच गायन केले जाते– मन करा रे प्रसन्न, सकळ सिद्धीचे कारण।** ***



# खरा गुरु

ब्र. कु. बालूभाई, शांतिबन (आबू रोड)

भारत हा अध्यात्म प्रधान देश आहे. त्यामध्ये महाराष्ट्र तर संताची भूमी असल्यामुळे,गुरुचे महत्त्व अधिकच पहायला मिळते. गुरुविना ज्ञान नाही, ज्ञानाविना सद्‌गती नाही व सद्‌गती विना जीवन निरर्थक आहे, अशी मान्यता आहे. त्यामुळे गुरुचे महत्त्व अनन्यसाधारण आहे म्हणूनच गायन केले जाते-

**गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरा।**

**गुरु साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरवे नमः।।**

गुरु हा साक्षात ब्रह्मा, विष्णु, महेश्वर तसेच परब्रह्म अर्थात परमात्याचे स्वरुप आहे. असे समजून त्याला वंदन केले जाते. त्यामुळे बहुतांशी सर्व धार्मिक परिवारात आजही गुरु करण्याची प्रथा दिसून येते. पंरतु कुठलाही देहधारी गुरु हा कुणाचीही सद्‌गती करू शकत नाही. याचा परिणाम असा होतो की प्रत्येक जन्मात गुरु करूनही आत्म्याचे अधःपतन होतच रहाते व कलियुगाच्या अंती मनुष्य आत्मा पतित, तमोप्रधन बनतो. त्याला पुन्हा पावन, सतोप्रधान बनविण्यासाठी निराकार शिव परमात्मा या सृष्टीवर अवतरित होतात व त्यांनी दिलेल्या सत्य ज्ञानामुळेच मनुष्य आत्म्यांची सद्‌गती होते. त्यामुळे आपल्या लक्षात आले असेल की या जगात गुरु अनेक आहेत व सद्‌गुरु केवळ एक शिव परमात्मा आहे. गुरु अर्थात जो आत्म्याला चांगले शिकवतो. (दत्तात्रयांनी २४ गुरु केले होते, असे म्हटले जाते.) सद्‌गुरु अर्थात जो आत्म्याला सत्य परमात्म्याचा मार्ग दाखवतो, आत्म्याची सद्‌गती करतो.

गुरु शब्दाचा अर्थ आहे अज्ञान अंधःकार दूर करणारा ('गु' अर्थात अंधःकार, 'रु' म्हणजे त्याचा निरोधक) ज्याप्रमाणे रात्रीच्या अंधःकारात प्रकाश देण्यासाठी आकाशातील चंद्र, तारे तसेच धरतीवरील असंख्य दिव्यांच्या झगमगाट आवश्यक आहे. परंतु जेव्हा सकाळी सूर्य उगवतो तेव्हा मात्र या सर्वांची गरज नसते. उलट आपण सर्व जण दिवे बंद करतो. **त्याचप्रमाणे द्वापर-कलियुगात आज्ञानाची रात्र असते तेव्हा जगाला ज्ञान प्रकाश देण्यासाठी अनेक गुरुंची आवश्यकता असते. परंतु जेंव्हा कलियुगाच्या अंती ज्ञानसूर्य शिव परमात्म्याचे या सृष्टीवर अवतरण होते तेव्हा मात्र सर्वत्र सत्य ज्ञानप्रकाश पसरतो. अशावेळी अन्य गुरुंची गरज रहात नाही.** तात्पर्य म्हणजे वर्तमान समयी ज्ञानसूर्य परमात्म्याचे अवतरण झाले आहे व तो आपल्याला सद्‌गतीसाठी सत्य ज्ञान देत आहे. आजवर जे ज्ञान आपण निरनिराळ्या गुरुंकडून ऐकत आलो, ते यथार्थ नव्हते. त्यामुळे आपली कोणाची सद्‌गती तर झाली नाहीच याउलट कालानुसार दुर्गतीच होत गेली (आज आपण असेही काही गुरु लोक जाणतो, ज्यांचे लाखो शिष्य होते (किंवा आहेत) परंतु ते गुरु मात्र जेलमध्ये शिक्षा भोगत आहेत.) यावरुन आपल्या लक्षात आले असेल की गुरु वा सद्‌गुरु एक शिव परमात्मा आहे. तोच सद्‌गतीदाता, पतितपावन, पापकटेश्वर, मुक्तेश्वर....आहे. परंतु मनुष्य ज्याच्याकडून काही ना काही चांगल्या गोष्टी शिकता; असे गुरु मात्र अपार आहेत. एक संतवचन आहे.

**जो जो जयाचा घेतला गुण । तो तो म्या गुरु केला जाण ।**

**गुरुशी आले अपारपण । जग संपूर्ण गुरु दिसे ।।**

या अनुषंगाने सुफी फकीर हसनची एक गोष्ट याठिकाणी नमूद कराविशी वाटते. त्यांना मरणाच्या अगोदर एका

व्यक्तीने विचारले की तुमचे गुरु कोण? तेव्हा ते म्हणले की तसे सांगणे कठीण आहे. मी जेथे-जेथे गेलो, तेथे गावा-गावात माझे गुरु आहेत. ज्यांच्याकडून मी काही शिकलो व जेथे माझे मस्तक झुकले, ते सर्व माझे गुरु आहेत. परंतु लोकांनी खुपच आग्रह केला तेव्हा फकीर हसन म्हणाले की तसे माझे ३ गुरु आहेत, जे मला बरेच काही शिकवून गेले. पहिले म्हणजे एक चोर. हे ऐकून लोकांना वाटले की हसनजींचे डोके ताळयावर दिसत नाही. ते आश्चर्यचकीत होऊन, त्यांच्याकडे पाहू लागले. तेव्हा त्यांनी पुढील स्पष्टीकरण दिले. एकदा चालत-चालत मी आर्ध्या रात्री गावात पोहोचलो. सर्व लोक झोपी गेले होते. धर्मशाळा बंद झाली होती-अशा वेळी एक चोर, चोरी करण्यासाठी निघण्याच्या बेतात होता. तेव्हा मी त्याला विचारले की, 'आजची रात्र मी तुझ्या घरी राहिलं तर चालेल का?' तेव्हा त्या चोराने स्पष्टपणे सांगितले की, ''तुमचे स्वागत आहे. परंतु मी एक चोर आहे. मी चांगला माणूस नाही. माझ्या घरी कोणीही व्यक्ती येत नाही. मीच दुसऱ्याच्या घरी चोरी करायला जात असतो'' यावर फकीर हसनला वाटले की इतका खरा व इमानदार माणूस मी कधी बधितला नाही. म्हणून तो म्हणाला की माझी काही हरकत नाही. मी तुझ्याजवळच राहतो. फकीर हसन चोराच्या घरी शांतपणे झोपला. सकाळी चोर घरी परतला तेव्हा हसनने दरवाजा उघडला व चोराला विचारले की काही मिळाले का? चोर उत्तरला, नाही. आज नाही तर उद्या प्रयत्न करीन. असा बरेच दिवसाचा त्याचा प्रयत्न अयशस्वी होत होता. तरी चोराचा उत्साह मात्र कमी होत नव्हता. तेव्हा फकीर हसनच्या मनात विचार आला की, ''मी सद्गुरुच्या शोधात गावोगावी भटकत असतो. जंगलातून फिरत असतो. परंतु मी मात्र रोज थकून जातो. कधी-कधी तर घरी पळून जायचा विचार येतो. तथापि या चोरातील धैर्यला व संयम मी जेव्हा जवळून पाहिला तेव्हा मात्र आशेचा किरण दिसू लागला. माझ्या मनातील निराशा वा मरगळ दूर झाली.'' म्हणून हसनचा पहिला गुरु तो चोर बनला.

पुढे फकीर हसन दुसऱ्या एका गावात गेला. तेथे त्याला एक छोटा मुलगा हातात दिवा घेऊन, मंदिराकडे जातांना दिसला. तेव्हा हसनने त्याला विचारले की हा उजेड कुठून आला? मुलगा अतिशय हुशार होता. त्याने प्रत्यक्ष कृतीनेच उत्तर दिले. त्याने दिव्याला एक फुंकर मारली आणि उलटून हसनला प्रश्न विचारला की आता तुम्ही सांगा की उजेड कुठे गेला? त्यावेळी हसनने त्या मुलाच्या हुशारीचे मनापासून कौतुक केले. तेव्हा हसनला एक गोष्ट लक्षात आली की गुरु एक दिव्याप्रमाणे आहे, जो स्वतः जळतो (अर्थात आत्मदीप तेवत असतो) व दुसऱ्यांना प्रकाश देतो.

फकीर हसनचा तिसरा गुरु होता, तहानेने व्याकुळ झालेला कुत्रा. एकदा हसन एका तळ्याच्या काठी बसला होता. तेथे एक कुत्रा पाणी पिण्यासाठी आला. जेव्हा तो कुत्रा पाणी पिण्यासाठी गेला तेव्हा त्याला पाण्यात आपलीच प्रतिमा दिसली. त्याला वाटल हा दुसरा कुत्रा येथे पाण्यातआहे. त्याला घाबरुन तो मागे सरकला. असे बऱ्याच वेळा पुन्हा-पुन्हा होत असतांना, त्याचा कंठ पार सुकून गेला. शेवटी हिंमत करून त्याने पाण्यात उडी मारली आणि पाणी पिऊन त्याने आपली तहान भागवली. पाण्यात उडी मारताच त्याचे प्रतिबिंब नाहीसे झाले होते.

यावर फकीर हसन म्हणाला अशीच माझीही स्थिती झाली होती. जोवर मी ईश्वराला दूरुन बघत होतो तेव्हा मला स्वतःचा अहंकार तिथे दिसत होता. त्यामुळे मी पुन्हा-पुन्हा माघारी येत होतो. परंतु जेव्हा परमात्मा प्राप्तीसाठी मन व्याकुळ झाले तेव्हा मात्र मी अहंकाराला विसरुन गेलो व परमात्म्याला समर्पण झालो.

**तात्पर्य म्हणजे ज्यांच्यापासून आपण चांगल्या गोष्टीं शिकत गेलो ते आपले गुरु होत. पिताश्री ब्रह्माबाबांनी देखील आपल्या लौकिक जीवनात १२ गुरु केले होते. परंतु तरीदेखील त्याना रचयिता व रचनेच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान नव्हते. द्वापरयुगातील थोर ऋषी-मुनींना देखील हे ज्ञान नव्हते.**

**पान क्र. ३४ वर**



रोहा : पोलिस स्टेशनमध्ये आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमानंतर ग्रुप फोटोत पोलिस निरीक्षक मुल्ला साहेब, बी. के. पूनम बहेन, व बी. के .नारायण भाई.



पर्वरी (गोवा) : रक्षाबंधन कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी जि. पं. सदस्य श्री. रुपेश नाईक, श्री. मांजरेकर ब्र.कु. शोभा बहन व ब्र. कु. वनिता बहेन



केसनंद (पुणे) : रक्षाबंधन कार्यक्रमात राखी बांधल्यानंतर ग्रुप फोटोत सरपंच सौ. सातव, उपसरपंच श्री. हरगुडे, ब्र. कु. सुनिता दीदी व सुनिल भाई



शाहुवाडी : पोलिस स्टेशनमध्ये राखी बांधल्यानंतर डी. एस. पी. देशमुख यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र.कु. वंदना व वर्षा बहेन.



कुरखेडा (गडचिरोली) : रक्षाबंधनाच्या कार्यक्रमात विद्यापीठ सदस्य श्री. फाये यांना वरदाताचे कार्ड देतांना ब्र.कु. नलिनी दीदी, सोबत ब.कु. नेत्रा दीदी.



सी.बी.डी. बेलापूर : सी. आर. पी. एफ. चे आय. जी. भ्राता राजकुमार हे ब्र. कु. शीला दीदी यांना 'मोमेंटो' प्रदान करुन सन्मानित करतांना.



राहू (पुणे) : आर.टी. ओ. ऑफीसर श्री. प्रदीप खेडकर यांना ईश्वरीय भेटवस्तू प्रदान करतांना ब्र.कु. मिनाक्षी बहेन, शेजारी ब्र. कु. संजय गोसावी.



धनकवडी (पुणे) : रक्षाबंधन कार्यक्रमात नगरसेवक श्री. बेलसरे श्री. कृष्णा गायकवाड, श्री. माणिकदादा बल्हाळ यांना राखी बांधतांना ब्र. कु सुलभा दीदी व आरती दीदी




उलवे (नवी मुंबई) : महिला सन्मान सोहळ्यात ईश्वरीय संदेश देतांना ब्र.कु. शीला दीदी, मंचासीन जेष्ठ समाजसेविका डॉ. सिंधुताई सपकाळ, भूमाता ब्रिगेडच्या संस्थापिका तृप्ती देसाई



श्रीरामपूर : शासकीय बाल संगोपन केंद्रात राखी बांधतांनाा ब्र.कु. मंदा बहेन, शेजारी ब्र.कु. बालूभाई (शांतिवन)



पुणे (वाघोली) : पोलिस स्टेशनवर आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमात राखी बांधतांना ब्र. कु. अनिता बहेन



पुणे (क्वार्टर गेट) : प्रधान रक्षा लेखा नियंत्रक श्री. बेंजामिन हे ब्र. कु. अरुणा बहेन यांचा सन्मान करतांना



संगमनेर : आमदार डॉ. सुधीर तांबे यांना राखी बांधतांना ब्र. कु. भारती बहेन शेजारी माजी महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात



शिर्डी : नगराध्यक्षा योगिताताई शेकळे यांना राखी बांधल्यानंतर ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. भारती व पद्माबहेन



धनकवाडी (पुणे) : आमदार भीमराव अण्णा तापकीर यांना पावन राखी बांधवांना ब्र. कु. सुलभा दीदी



वाशी (नवी मुंबई) : माजी खासदार भ्राता संजीव नाईक व माजी पर्यावरण मंत्री भ्राता गणेश नाईक यांना रक्षासूत्र बांधतांना ब्र. कु. शीला दीदी, प्रिती व निलम बहेन




विटा (सांगली) : डॉ. जगन्नाथ दीक्षित यांना ईश्वरीय भेटवस्तू प्रदान करतांना ब्र. कु. नंदा बहेन, साधना बहेन व संतोषभाई



नागठाणे (सातारा) : जेष्ठ समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांना पावन राखी बांधतांना ब्र.कु. सुवर्णा बहेन सोबत ब्र.कु. अंकिता बहेन व डॉ. दीपक हरके



मलकापूर : नगराध्यक्ष श्री. केसरकर यांना राखी बांधतांना ब्र. कु. वंदना व वर्षा बहेन शेजारी उपस्थित सर्व नगरसेवक



भिलवडी (सांगली) : जिल्हा परिषद सदस्य श्री. सुरेंद्र वाळवेकर यांना रक्षासूत्र बांधतांना ब्र. कु. मीरा बहेन



विटा (सांगली) : ॲडवोकेट बार असोसिएशनमध्ये ईश्वरीय संदेश दिल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. नंदा व साधना बहेन.



बांबवडे (कोल्हापूर) : रक्षाबंधनच्या कार्यक्रमात उपस्थित विभिन्न गावांचे सरपंच व उपसरपंच सोबत ब्र.कु. संगीता, दुर्गा व विद्या बहेन.




अहमदनगर : ६५ जागतिक रेकॉर्ड करणारे प्रथम भारतीय म्हणून डॉ. बी. के. दीपक हरके यांना सन्मानित करतांना डॉ. दिवाकर सुकुल, चेअरमन इंडो–यु.के. कल्चरल फोरम



डोणोली (बांबवडे) : आय.टी.आय. कॉलेजमध्ये रक्षाबंधन कार्यक्रमाअंतर्गत योगाभ्यास करवितांना ब्र. कु. संगीता बहेन.



(खास ब्रह्मावत्सांकरिता)

# संगमयुगी सर्वश्रेष्ठ भाग्य

ब्र. कु.गोदावरी दीदी, मुलुंड (मुंबई)

संगमयुगी ब्राह्मण जन्म हा संपूर्ण कल्पातील सर्वश्रेष्ठ जन्म आहे. कारण तो ईश्वरीय जन्म आहे. अनादि शिव पिता व आदि पिता ब्रह्माबाबा यांच्याद्वारे आपल्याला अलौकिक जन्म प्राप्त होतो. आपला जन्मच मुळी भाग्यविधाता द्वारे झाला आहे. त्यामुळे या जन्माचे भाग्य किती थोर! आपल्या या श्रेष्ठ भाग्याची सदा स्मृती ज्यांना असते ते सदैव हर्षित असतात. **परंतु ही स्मृती प्रत्यक्ष रुपात असली पाहिजे. ती केवळ बुद्धीपर्यंत सीमित नसावी. तर ती आपल्या चलन व चेहऱ्याद्वारे प्रत्यक्ष रुपात स्वतःला अनुभवाला आली पाहिजे. त्याचबरोबर दुसऱ्यांनाही दिसले पाहिजे की यांच्या चलन व चेहऱ्यात श्रेष्ठ भाग्याची रेषा चमकते आहे.**

**संगमयुगी प्रभु परिवार :**

संगमयुगात आपल्याला साकार रुपाने प्रभु पालना प्राप्त आहे. आपण प्रभु परिवाराचे बनलो आहोत. अलौकिक प्राप्तींच्या हिंदोळ्यावर आपण झोके घेत आहोत. ब्राह्मण बनल्यानंतर आपला परिवार बदलला, युग बदलले. धर्म-कर्म सर्व काही बदलून गेले. युग परिवर्तन झाल्याने दुःखमय संसारातून आपण सुखमय संसारात आलो. साधारण आत्म्यापासून पुरुषोत्तम बनलो. द्वापरयुगापासून ६३ जन्म विकारांच्या चिखलात वा दलदलीत राहिलो. आता संगमयुगात त्यातून कमळ उमलले आहे. **शिवबाबांनी आपल्याला पवित्र गृहस्थाश्रमात राहण्याचे श्रीमत दिले. फलस्वरुप भाऊ-बहिणीच्या पवित्र प्रेमाच्या सूत्रात प्रभुपरिवार बांधला गेला आहे. अशा प्रभु परिवाराचे सदस्य बनणे म्हणजे जन्म-जन्मांतरासाठी आपले श्रेष्ठ भाग्य बनवणे होय.** वर्तमान संगमयुगात तर आपण सर्व प्राप्ती संपन्न बनलो आहोत. मास्टर सर्व शक्तिवान बनलो आहोत. प्रकृती देखील भविष्यात आपली दासी बनून सेवा करते. प्रकृती आपल्याला श्रेष्ठ समजून, आपल्यावर जन्म-जन्मांतरासाठी पंखा झुलवित राहिल. प्रभु परिवारातील आत्म्यांशी आजदेखील सर्व आत्म्यांचा स्नेह आहे. या स्नेहाच्या आधारेच आजही इष्ट देवी देवतांच्या रुपात गायन व पूजन केले जाते.

**स्वयं भगवान आपला परमपिता, परमशिक्षक व सद्‌गुरु –**

ब्राह्मण जन्मात स्वयं भगवान आपला परमपिता, परमशिक्षक व सद्‌गुरु बनला आहे. पित्याच्या संबंधाने आपल्याला वारसा प्राप्त होतो. फलस्वरुप आपल्याला सर्व ईश्वरीय खजिन्यांचा अधिकार प्राप्त होतो. परमशिक्षकाच्या रुपाने श्रेष्ठ शिक्षण व उच्च पदाची प्राप्ती होते. सृष्टिचक्रात द्वापरयुगापासून आजवर जे विनाशी पद प्राप्त झाले आहेत, त्यामध्ये राज्य पद हेच श्रेष्ठ पद गायले आहे. परंतु यापेक्षा आपल्याला प्राप्त होणारे सत्ययुगी राज्य पद हे कितीतरी पटीने श्रेष्ठ आहे. त्याचबरोबर संगमयुगातील एक ब्राह्मण जन्मात ईश्वरीय ज्ञानाद्वारे आपण अनेक जन्मांकरिता श्रेष्ठ भाग्य प्राप्त करु शकतो. किती महान भाग्यशाली आहोत आपण! बाकी या दुनियेत केवळ या जीवनात शरीर निर्वाह अर्थ, पैसा कमविण्यासाठी लोक शिक्षण घेतात. लाखो, करोडो रुपये कमवितात देखील. परंतु आपल्याला होणारी प्राप्ती ही अगणित आहे. आपल्या प्रत्येक पावलावर पद्मांची कमाई आहे. दिवसभरात आपण शिवस्मृतीत जितकी

पाऊले टाकतो तितके पद्म आपल्या खात्यात जमा होतात. ईश्वरीय शिक्षणाद्वारे प्राप्त होणारे भाग्य आपण प्रत्यक्ष अनुभव केले पाहिजे.

सद्‌गुरुच्या रुपाने आपल्याला महामंत्र व वरदानांची प्राप्ती होते. 'पवित्र बना, योगी बना' हा महामंत्र जन्मताच सद्‌गुरु शिवबाबांकडून मिळतो. हा महामंत्र सर्व प्राप्तींची गुरुकिल्ली आहे. कारण 'योगी जीवन, पवित्र जीवन' सर्व प्राप्तींचा आधार आहे. त्याचबरोबर शिवबाबांकडून अनेकानेक वरदान आपल्याला प्राप्त होतात. वरदानांची जणू खाण प्राप्त होते. त्याद्वारे ब्राह्मण जीवनात अपार खुशीचा अनुभव होतो. अशाप्रकारे शिवबाबांकडून आपल्याला वारसा, ईश्वरीय शिक्षण, महामंत्राची गुरुकिल्ली तसेच वरदानांची खाण प्राप्त झाली आहे. यावरुन आपल्या लक्षात येईल की आपण किती भाग्यवान आहोत!

**संगमयुगी सर्व ब्राह्मण – बेगमपुरचे बादशहा**

संगमयुगी ब्राह्मणांचा संसार 'बेगमपुर' अर्थात दुःख मुक्त संसार आहे. ब्राह्मण संसारातील अधिकारी आत्मे हे बेगमपुरचे बादशहा आहेत. त्यामुळे आपल्या संकल्पातही 'गम' अर्थात दुःखाची लहर असता कामा नये. म्हणूनच प्रत्येकाने हे चेक करा की अशाप्रकारची आपली श्रेष्ठतम स्थिती बनली आहे का? बेगमपुरचे बादशहा अर्थात सदैव सुखाच्या शैयेवर, सुखमय संसाराचा अनुभव करणारे. ब्राह्मणांच्या जीवनात जरासुद्धा दुःख असता कामा नये. कारण ब्राह्मणांच्या खजिन्यात अप्राप्त अशी कोणतीही वस्तू नाही. वास्तविक कुठलीही अप्राप्ती हेच दुःखाचे कारण असते व प्राप्ती हेच सुखाचे साधन असते. त्यामुळेच प्रत्येक ब्राह्मण आत्मा हा सर्व प्राप्ती स्वरुप असल्याने, सदा सुख स्वरुप असला पाहिजे.

खरं तर संबंध व संपत्ती ही दोनच विशेष सुखाची साधने आहेत. ब्रह्मावत्सांना तर अविनाशी सुखाचा संबंध प्राप्त आहे. संबंधात सुद्धा एखाद्या संबंधाची कमी असेल तर दुःखाची लहर अनुभवाला येते. परंतु ब्राह्मण परिवारात सर्व संबंध एक शिवबाबांशी अविनाशी स्वरुपाचे आहेत. त्यामुळे दुःखाची लहर येऊच शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे संपत्तीत सुद्धा सर्व खजिने अर्थात सर्व संपत्तीचा श्रेष्ठ खजिना जो 'ज्ञानधन' आहे, तो प्राप्त असल्याने, सर्व धनाची वा संपत्तीची प्राप्ती आपोआपच होते. अशाप्रकारे संपत्ती व संबंध सर्व काही प्राप्त आहे. फलस्वरुप ब्राह्मणांचा संसार हा बेगमपुर अर्थात 'बेगम' (दुःखमुक्त) संसार आहे अथवा सदा सुखमय संसार आहे. **तात्पर्य म्हणजे संगमयुगी सर्व ब्राह्मण बेगमपुरचे बादशहा आहेत. सत्ययुगी बादशाही ही सुद्धा संगमयुगी बेगमपुरच्या बादशाहीपुढे काहीच नाही. वर्तमान संगमयुगातील प्राप्तीचा नशा, खुशी ही सत्ययुगी बादशाहीपेक्षा पद्मगुणा श्रेष्ठ आहे. कसे ते थोडक्यात पाहूया.**

**संगमयुग हिरेतुल्य तर सत्ययुग सुवर्णतुल्य –**

**संगमयुग हे हिरेतुल्य युग आहे. त्याच्या तुलनेने सत्ययुग हे सुवर्णतुल्य युग आहे. सत्ययुगात आपले माता–पिता हे महान आत्मे (देवात्मे) असतील. परंतु संगमयुगात स्वयं परमात्मा आपले माता–पिता आहेत.** आपण सत्ययुगात 'गुड मॉर्निंग' महान आत्म्यांना करु. परंतु संगमयुगात परमात्मा शिव पित्याला 'गुड मॉर्निंग' करतो. सत्ययुगात दास–दासींच्या हातून आपली पालना होईल. आता संगमयुगात शिवबाबा आपली पालना करीत आहेत. सत्ययुगात प्रभात समयी प्रकृतीचे नैसर्गिक संगीत आपल्याला जागवील. परंतु संगमयुगात अमृतवेळेला, स्वयं प्रकृतीचा मालक परमात्मा पिता आपल्याला जागवतो. 'मीठे बच्चे, प्यारे बच्चे..' असे म्हणून साद घालतो. हे ईश्वरीय मधुर बोल प्रकृतीच्या संगीतापेक्षा किती महान आहेत! सत्ययुगाात आपण रत्नजडीत हिंदोळ्यावर बसून झोके घेऊ परंतु संगमयुगात शिवबाबांच्या गोदीत बसून कधी अतींद्रिय सुखाचा तर कधी खुशीचा झोका घेत असतो.सत्ययुगी रत्नजडीत झोक्यापेक्षा हा झोका किती महान आहे!

सत्ययुगात अति स्वादिष्ट वृक्षांची फळे खायला मिळतील. परंतु आता संगमयुगात वृक्षपती शिवबाबांपासून सर्व संबंधाचा रस, सर्व प्राप्ती संपन्न प्रत्यक्ष फळांचा आस्वाद घेता येतो. मुख्य म्हणजे संगमयुगातच सत्ययुगी संस्कार तसेच अनेक जन्माचे श्रेष्ठ प्रालब्ध बनविले जाते. म्हणूनच संगमयुग सर्वश्रेष्ठ युग आहे.

सत्ययुगात आपण विमानाने या साकार लोकाची सैर करु. तथापि संगमयुगात बुद्धिरूपी विमानाद्वारे आपण तिन्ही लोकांची यात्रा करु शकतो. सत्ययुगात आपल्याला विश्वनाथ असे म्हटले जाईल. आता संगमयुगात मात्र आपण त्रिलोकीनाथ आहोत कारण आता आपल्याला तिन्ही लोकाचे, तिन्ही काळाचे ज्ञान आहे. सत्ययुगात मात्र देवीदेवतांना हे ज्ञान नसेल. **संगमयुगात प्रत्येक ब्राह्मण हा नॉलेजफुल, पॉवरफुल, ब्लिसफुल, त्रिनेत्री, त्रिकालदर्शी, स्वदर्शनचक्रधारी असल्याने देवतांपेक्षाही श्रेष्ठ भाग्यवान आहे.**

सत्ययुगात आपण विश्व राज्य अधिकारी असू, राज्यकर्ते असू, माननीय असू, परमपूज्य असू. परंतु आता संगमयुगात आपण विश्व-कल्याणकारी महादानी, वरदानी आहोत; हे सदैव लक्षात ठेवलं पाहिजे. संगमयुगात शिवबाबांची याद व ईश्वरीय सेवा यांच्याआधारे प्रत्येक पावलावर आपल्याला पद्मांची कमाई होत आहे, हे कधीही विसरता कामा नये.

**आपण ब्राह्मण आत्मे, देव आत्म्यांपेक्षाही उच्च आहोत. हा नशा सदैव ठेवा. दुसऱ्या इतर नशांमुळे नुकसान होते. परंतु या आत्मिक नशेमुळे फायदाच फायदा आहे. म्हणून हा नशा वाढवत चला, असे शिवबाबा वारंवार सांगतात.** या नशेमुळे सदैव चढती कला अनुभवाला येते. हा नशा जर उतरला तर जुन्या पतित दुनियेची आठवण येईल. याउलट आत्मिक नशा जर चढलेला असेल तर नवीन दुनियेची स्मृती राहिल. हा ब्राह्मण संसारच नवीन संसार आहे. सत्ययुगापेक्षाही हा संसार अति श्रेष्ठ आहे. त्यामुळे आपल्या अंतरंगात सदैव हेच गीत वाजत राहिले पाहिजे - **खुशीयों भरी जिंदगानी हमारी । देवीदेवताओंसे भी है जो प्यारी ।।**

**वर्तमान समयाची पुकार :**

वर्तमान समयी सर्व आत्म्यांची हीच पुकार आहे की, ''हे इष्टदेव-देवी, लवकर परिवर्तन करा.' त्यासाठी प्रत्येक ब्रह्मावत्साने आता दातापनचे संस्कार प्रत्यक्ष केले पाहिजेत. आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्या प्रत्येक आत्म्याला त्याच्या इच्छेनुसार काही ना काही गुण वा शक्ती अवश्य दिले पाहिजे. कोणीही आत्मा वंचित रहाता कामा नये. त्याचबरोबर असेही विचार मनात आणू नका की देण्याचे काम तर वरिष्ठ महान आत्म्याचे आहे. आम्ही तर आताच ज्ञानात आलो आहोत. परंतु समयानुसार आता आपल्याला दाता बनायचे आहे. सर्वांनाच शुभभावना व शुभकामनांचे दान द्यायचे आहे.

आपण ब्रह्मावत्स विश्वकल्याणाचे ठेकेदार आहोत, हे कधीही विसरु नका. विश्वातील आत्मे आपली प्रतिक्षा करीत आहेत की शांतीचे दूत कधी येतील. आपल्यावर आशीवार्द वा कृपा करणारे आपले इष्टदेव कधी येतील. भक्त आजही मोठमोठ्याने मंदिरात घंटा वाजवित आहेत. देवीदेवतांना जोरजोरात आळवीत आहेत. **अशावेळी आपणा देवात्म्यांचे कर्तव्य आहे-भक्तांची पुकार ऐकून, त्यांच्यावर उपकार करणे. त्यांना शिवपित्याचा सत्य परिचय देऊन, मुक्ती व जीवनमुक्तीचा वारसा मिळवून देणे. त्यांना ईश्वरीय गुण व शक्तीचे दान देणे. त्यामुळे आता ब्रह्माबापसमान फरिश्ता (देवदूत) बनून विश्वकल्याणाच्या महान कार्यासाठी, आपला समय, श्वास, संकल्प व शक्ती सफल करा, सफल करा.** ***

**आता कुठल्याही समस्येविषयी विचार करू नका. केवळ प्राप्ती-विषयी विचार करा. आता पुढे प्राप्तीच प्राप्ती आहेत. सदैव नाचत रहा, गात रहा. प्रत्येक क्षणी खुशी साजरी करा. वा! बाबा वा! वा! माझे श्रेष्ठ भाग्य वा! हेच गीत गात रहा.**
**- दादी गुलजारजी**



# परमात्म शक्ती आणि वरदानांचा अनुभव

ब्र. कु. लाजवंती, भांडुप (मुंबई)

परमपिता परमात्मा अनंत शक्ती आणि वरदानांचे भांडार आहेत. परंतु प्रश्न असा आहे की या सर्व शक्ती आणि वरदान प्राप्त करणारा कोण आहे? जेव्हा पाऊस पडतो तेव्हा धरणी पाण्याला सामावून घेते आणि त्यानंतर हिरवीगार होऊन आपल्याला प्रसन्नता प्रदान करते. मुबलक भाजीपाला व धनधान्य पिकवून आपली पालना करते. त्याचबरोबर सूर्यप्रकाशाचा उपयोग मानवी शरीर, झाडे-झुडपे, पशु-पक्षी यांच्या वाढीसाठी होतो. थंडगार शीतल हवेमुळे मानवी मन प्रसन्न प्रफुल्लित होते. या सर्व भौतिक शक्ती आहेत. ज्यांचा आपण नियमित वापर करतो व आपलं जीवन सुरळीत चालवतो. परंतु ईश्वरीय शक्ती आणि वरदान सूक्ष्म आहेत. त्यामुळे या शक्ती मिळविण्यासाठी किंवा अनुभव करण्यासाठी सूक्ष्म सत्ता पाहिजे. मग कोण आहे ती सूक्ष्म सत्ता?

मानवी शरीर हे सूक्ष्म आणि स्थूल अशा दोन्ही शक्तींनी बनलेले आहे. स्थूल अर्थात जे आपल्या डोळ्यांनी दिसतं ते शरीर आणि सूक्ष्म अर्थात जे आपल्या डोळ्यांना दिसत नाही, तो आत्मा. आत्मा एक उर्जा आहे, जो आपल्या भृकुटीमध्ये स्थित होऊन, शरीराला चालविण्याचे कार्य करतो. आत्मा ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे आणि मन, बुद्धी व संस्कार सहित आहे. विचार करणे, एखादी गोष्ट लक्षात ठेवणे, निर्णय घेणे, कल्पना करणे हे सर्व आत्म्यामध्ये आहेत. आत्मा शरीरातून निघून गेला की हे पाच तत्त्वांनीं बनलेले हे शरीर, निर्जिव पुतळा बनते. **तात्पर्य म्हणजे ईश्वरीय शक्ती आणि वरदान ग्रहण करणारा हा आत्मा आहे.**

**शक्ती आणि वरदानांचा दाता :**

परमपिता परमात्मा शिव हाच शक्ती आणि वरदानांचा दाता आहे. परमात्मा या शब्दामध्येच परमात्मा पित्याची खरी ओळख सामावलेली आहे. परम शब्दाचा अर्थ आहे सर्वोच्च. या विश्वामध्ये अनेकानेक आत्मे आहेत, जसे देवात्मा, महात्मा, पुण्यात्मा, धर्मात्मा, साधारण आत्मा, पापात्मा इत्यादी. परमात्मा हेच सर्वात उच्च आहेत. ज्याप्रमाणे न्यायालये अनेक आहेत. परंतु सर्वोच्च न्यायालय एकच असते. मंत्रीमंडळांत मंत्री अनेक असतात परंतु प्रधानमंत्री मात्र एकच असतो. त्याचप्रमाणे करोडो आत्म्यांमध्ये जे सुप्रीम आहेत, प्रधान आहेत, मुख्य आहेत, ते परमपिता शिव परमात्मा आहेत.

ज्याप्रमाणे आत्मा ज्योतिर्बिंदू स्वरुप आहे. त्याप्रमाणे परमात्मा शिव पिता देखील ज्योतिर्बिंदू स्वरूप आहेत. परंतु ते सर्व गुणांचे सागर आहेत. ते सर्वश्रेष्ठ आहेत कारण तेच सर्व आत्म्यांचे मात-पिता, बंधु-सखा आणि शिक्षक-सद्गुरु आहेत. ते जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्त आहेत. ते ज्ञान, गुण व शक्तीचे सागर आहेत. परमात्मा शिव नवीन, दैवी, सत्ययुगी, दुनियेचे रचयिता आहेत. **कलियुगाचे अंती धर्मग्लानीच्या वेळी ते सृष्टीवर अवतरित होऊन, पतित आत्म्यांना पावन बनविण्याचे दिव्य कर्तव्य करतात. ज्यावेळी आत्मे पावन बनतात त्यावेळी सृष्टीवर स्वर्गाची स्थापना होते आणि परमात्मा पिता आपले कर्तव्य पूर्ण झाल्यावर, परत आपल्या घरी परमधाम मध्ये जातात.**

**ईश्वरीय शक्ती :**

जन्म-जन्मांतर भक्त ईश्वराकडून शक्ती मागत असतात. परंतु केवळ मागण्याने अथवा प्रार्थना केल्याने ईश्वरीय

शक्ती प्राप्त होत नाहीत. म्हणूनच आज मानवात दुर्बलता सर्वत्र व्याप्त आहे. परिणामस्वरुप चिंता, वैर, हिंसा, भय, अपराध, उग्रवाद, आतंकवाद, भ्रष्टाचार, असहिष्णुता इत्यादी गोष्टी सगळीकडे दिसून येतात. त्यामुळे संपूर्ण मानव जातीला या दुर्बलते पासून मुक्त करण्यासाठी, शक्तिसंपन्न, निर्विघ्न, सदाचारी, सुखी व समृद्ध बनविण्यासाठी, ईश्वरीय शक्ती प्राप्त करण्याची विधी समजावून घेणे, अनिवार्य आहे.

परमपिता परमात्मा अनंत शक्तींचे भांडार वा सागर आहेत. त्यापैकी काही शक्तींचा उल्लेख खाली केला आहे.

**१) ज्ञानाची शक्ती –** परमात्मा ज्ञानाचे सूर्य आहेत. त्यांच्यात सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान आहे. ज्याप्रमाणे सूर्योदय झाल्यावर अंधःकार नाहिसा होतो व चारही दिशा प्रकाशमान होऊन जातात. सूर्य किरणांमुळे वातावरण शुद्ध बनते. सूक्ष्म किटाणु नष्ट होतात. सूर्यप्रकाश मिळताच झाडे-झुडपे, वनस्पती तसेच मानवी जीवन सक्रिय बनते. उर्जेचा सर्वत्र संचार होऊ लागतो. **त्याचप्रमाणे परमपिता शिव परमात्मा, जे ज्ञानसूर्य आहेत, त्यांचे धरतीवर अवतरण होणे म्हणजेच विश्वातून अज्ञान अंधःकार दूर होणे होय. परमात्म्याच्या दिव्य ज्ञानाचा प्रकाश जेव्हा संपूर्ण विश्वात पसरतो तेव्हा शक्तिहीन, दुर्बल आत्मे पुन्हा शक्तिशाली बनतात. त्यांच्या जीवनात सुंदर परिवर्तन होते.** मनुष्य आत्मे विकारांपासून वा अवगुणांपासून मुक्त होतात. फलस्वरुप आत्मा कर्मेंद्रियजीत, मायाजीत, विकर्माजीत व कर्मातील स्थिती प्राप्त करतो.

**२) गुणांची शक्ती –** समुद्र जसा विशाल आहे, बाहेरुन त्याच्या उंच लाटा दिसतात परंतु त्याच्या तळाशी मात्र गंभीर शांती व शीतलता असते. त्याच्या तळाशी असंख्य रत्ने असतात. त्याचप्रमाणे परमात्मा सर्व गुणांचे सागर आहेत. जो या सागरात खोलवर डुबकी मारतो, त्याला सर्वगुणरुपी रत्ने प्राप्त होतात. अपार शांतीचा अनुभव होतो. आनंद प्रेम व सुखाने आत्मा भरपूर होतो. हीच परमात्य शक्ती आहे.

**३) सर्व संबंध निभावण्याची शक्ती** – ज्याप्रमाणे लौकिक मात-पिता मुलांना जन्म देऊन, त्यांची पालना करतात. त्यांना पौष्टिक आहार व चांगले शिक्षण देऊन स्वस्थ व आत्मनिर्भर बनवितात. संगदोषापासून वाचवितात. त्याचप्रमाणे परमात्मा सुद्धा सर्व आत्म्यांचे खरे मात-पिता आहेत. त्यांची ओळख होताच, ते आपल्याला सर्व शक्ती प्रदान करतात. रोज ज्ञानाचा पौष्टिक खुराक खाऊ घालून, आत्म्याला शक्तिमान बनवितात. आपल्या श्रेष्ठ संगतीचा रंग लावून, आत्म्याला देह व देहाच्या सर्व संबंधापासून मुक्त करतात.

परमशिक्षकाच्या रुपाने त्यांची शिकवण आपल्या जीवनाचे सदैव रक्षण करते. ईश्वरीय ज्ञानामुळे आत्म्याला दूरदृष्टी व विशालबुद्धी प्राप्त होते. या सृष्टी नाटकाची पुनरावृत्ती जशीच्या तशी होते. या ज्ञानामुळे आत्मा निश्चिंत, अचल-अडोल व एकरस स्थितीत राहतो. त्याला ज्ञानाची शक्ती प्राप्त झाल्याने, कुठलीही परिस्थिती तो सहज पार करतो.

परमसद्‌गुरुच्या रुपाने परमात्मा मार्गदर्शक बनून, श्रेष्ठ मत प्रदान करून या विषय विकाररुपी भवसागरातून पार घेऊन जातो. मुक्ती व जीवनमुक्तीचा वारसा देतो. तसेच कर्माच्या गुह्यगतिचे ज्ञान देऊन, श्रेष्ठ कर्म करायला शिकवतो. विकार व विकर्मांपासून मुक्त करतो. वर्तमान तसेच भूतकाळातील कर्मबंधनातून मुक्त करून, पवित्रतेच्या शिखरावर घेऊन जातो.

तात्पर्य म्हणजे परमात्मा शिव पिता सर्वसमर्थ आहे. सदा कल्याणकारी आहे. म्हणूनच त्याला सदाशिव असेही म्हटले जाते. तो कधीही कुणाचे अकल्याण करत नाही. (त्यामुळे परमात्म्याविषयी मनात कुठलीही भीती बाळगण, हे पूर्णतः चुकीचे आहे.) परमात्मा पिता प्रेमाचा सागर आहे. तो सर्वशक्तिमान आहे. त्याच्यापासून शक्ती कशी प्राप्त करायची हे आपण थोडक्यात पाहूया.

जसे सूर्यप्रकाशासाठी सूर्याकडे

मागणी करावी लागत नाही. फक्त सूर्याच्या समोर जावे लागते. तसेच ज्ञानसूर्य भगवंताकडून शक्ती मिळविण्यासाठी मन-बुद्धी एकाग्र करुन केवळ त्याच्याजवळ जायची गरज असते. अर्थात मन-बुद्धीचे योग्य कनेक्शन जोडता आले पाहिजे. कसे ते थोडक्यात पाहू-

सर्वप्रथम आपला बुद्धीरुपी नेत्र परमधाम निवासी शिव परमात्म्याच्या बिंदूरुप, ज्योतिस्वरुपावर स्थिर करा. नंतर मनाद्वारे संकल्प करा की, परमप्रिय शिवबाबा, तुम्ही सर्व शक्तिवान आहात, दाता आहात, कल्याणकारी व दयाळू आहात. तुम्ही सर्व समर्थ व विश्वपरिवर्तक आहात. मी आत्मा तुमचा अविनाशी मुलगा आहे. जसे तुम्ही आहात, तसाच मी देखील आहे. आपण सर्व शक्तीवान असल्याने, मी तुमचा मुलगा मास्टर सर्वशक्तिवान आहे. सर्वांचा कल्याणकारी व दयाळू आहे. परमप्रिय शिवबाबा, तुमच्याकडून मज आत्म्यावर शांतीची शक्ती, प्रेमाची शक्ती, पवित्रतेची शक्ती, ज्ञानाची शक्ती किरणांच्या रुपाने पडत आहे. त्यापासून माझ्या सभोवती प्रकाशाचे एक कवच निर्माण झाले आहे. ज्यात मी सदैव सुरक्षित आहे. या सर्व शक्ती माझ्यापासून निघून चारी दिशांना पसरत आहेत. फलस्वरुप सभोवतालचे वातावरण शक्तिशाली बनत आहे तसेच अन्य आत्म्यांना सुद्धा बळ प्राप्त होत आहे.

**अशाप्रकारे मनन केल्याने आत्म्याला ईश्वरीय शक्तीची अनुभूती होते. यालाच सहज राजयोग असेही म्हटले जाते. यासाठी मुख्य आवश्यकता आहे ती म्हणजे देहसहित, देहाचे सर्व संबंध विसरुन, स्वतःला आत्मा समजण्याची व प्रेमपूर्वक परमात्मा शिवपित्याची आठवण करण्याची.**

**ईश्वरीय वरदान :**

शक्ती प्राप्त करण्यासाठी आपल्याला थोडा पुरुषार्थ अवश्य करावा लागतो. परंतु वरदानाचा अर्थ आहे न मागता, पुरुषार्थ न करता, सहज व अनायास होणारी प्राप्ती. वास्तविक वर्तमान समय हाच वरदानी समय आहे. आजवर ईश्वराला प्राप्त करण्यासाठी जन्मजन्मांतर अनेक कठोर साधना केल्या. शरीराला कष्ट दिले तरी त्याची प्राप्ती आपल्याला झाली नाही. तोच दयाळू परमात्मा आता वर्तमान संगमयुगात (कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा आदि यांच्या संधीकाळात) आपल्या समोर साकार रुपात अवतरित झाला आहे.

आत्मानुभूती, परमात्मानुभूती तसेच जीवनमुक्तीचा अनुभव एक सेकंदात करणे, हेच त्याचे खरे वरदान आहे. आत्म्याचे अनेक जन्मांचे पाप आणि विकार, त्याची पतितपावनी दृष्टी पडताच नष्ट होतात. त्याच्या वरदानाद्वारे आत्म्याची सर्व प्रकारची दरिद्रता समाप्त होते. त्याचे सन्मुख मीलन हीच वरदानांची पर्वणी आहे. फलस्वरुप आपले मन एकाग्र होते, मनात दिव्यतेचा प्रकाश पसरतो, मन सकारात्मक व शक्तिशाली बनले, बोल वरदानी बनतात तसेच दृष्टी-वृत्तीत कल्याणाची भावना भरली जाते. जितकं आपल्या हृदयात ईश्वराविषयी प्रेम असेल तितकीच आपल्याला ईश्वरीय वरदानांपासून प्राप्ती होते.

**अशाप्रकारे वरदाता शिव-बाबांच्या वरदानांचा अनुभव करण्यासाठी आपले मन अतिशय स्वच्छ हवे. आत एक व बाहेर दुसरे रुप नको. आपले बोल व कर्म समान असले पाहिजेत. शिवबाबांची याद अव्यभिचारी असली पाहिजे अर्थात एक बाप दुसरा कोणी नाही. त्याचबरोबर जो संपूर्ण ट्रस्टी (विश्वस्त) आहे, समर्पण बुद्धी आहे. प्रत्येक पाऊल श्रीमतानुसार चालतो, त्यालाच प्रत्येक पाऊलावर वरदानांची अनुभूती होते. त्याचे जीवनच वरदानी बनून जाते.**

**- भावानुवाद : ब्र.कु. गौतमी, ठाणे (पू.)**

**संगमयुग टॉप पॉईंट आहे. त्यावर उभे राहून जर तिन्ही काळ पाहिले तर अंतःकरणातून आनंदाचे हेच उद्गार बाहेर पडतील की, आम्हीच देवता होतो आणि आता पुन्हा बनत आहोत. यालाच म्हणतात मास्टर नॉलेजफुल.**



# कैरबियन लोकांना मी जवळून पाहिले...

ब्र. कु. आत्मप्रकाश, आबू पर्वत

प्राणप्रिय बापदादा, आदरणीय दादी जानकीजी तसेच मधुबनमधील सर्व वरिष्ठ बंधुभगिनींचा आशीर्वाद घेऊन, मे-जून १०१८ मध्ये अमेरिकेला ईश्वरीय सेवार्थ जाण्याचा माझा कार्यक्रम बनला. अमेरिकेत गेल्यावर दीदी मोहिनीजी यांचे आशीर्वाद घेऊन मी कैरबियन देशांच्या यात्रेवर रवाना झालो. तेथे गेल्यावर हेमलता बहेन व अन्य बहिणींनी माझे जोरात स्वागत केले. **कैरेबियन मधील त्रिनिदाद, सुरीनाम ग्याना, जमैका, क्युरेकस, बोनेर, अरुबा, सॅट मार्टिन या आठ देशांत मी सेवेसाठी गेलो. तसं पाहिलं तर हे सर्व देश भारतापासून खूपच दूर आहेत परंतु येथील लोकांना जेव्हां मी जवळून भेटलो तेव्हा त्यांच्यात मला खूपच आपलेपणा व जिव्हाळा जाणवला.** परिणामतः आपसांतील सर्व सीमा समाप्त झाल्या व सर्व ठिकाणी 'विश्व एक गाव वा परिवार, असल्याचा अनुभव आला.

दैवी परिवारासाठी ठिकठिकाणी क्लासेस, योगभट्टी, कॉमेट्रीद्वारे योगाभ्यास इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच निरनिराळ्या विश्वविद्यालयात, कंपनीत, व्यापारी मंडळात व क्लबमध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम झाले. प्रत्येक कार्यक्रमानंतर श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली जात असत. त्यातील काही निवडक प्रश्न व त्यांची उत्तरे आपल्या माहिती व मार्गदर्शनासाठी पुढे दिली आहेत. -

**प्रश्न –** एका खेळाडूने विचारले की मला फारच नकारात्मक संकल्प येतात. कुठलेही कार्य करण्यापूर्वी मला हा विचार येतो की हे कार्य मी करु शकणार नाही. मला सफलता मिळणार नाही. कृपया याचे समाधान कोणते हे सांगावे.

**उत्तर –** जसे दिवस असला की रात्र नसते, प्रकाश असला की अंधःकार नसतो. तसेच मनात जर सकारात्मक विचार असतील तर नकारात्मक विचार येणारच नाहीत. परंतु सकारात्मक विचार मनात नसल्याने, नकारात्मक विचार येतात. त्यामुळे आपल्याला मनात सकारात्मक संकल्प उत्पन्न करण्याची आवश्यकता आहे. **त्यासाठी सकाळची वेळ ही सर्वोत्तम आहे. सकाळी उठल्यावर काही वेळ इलेक्ट्रॉनिक साधनांचा (मोबाईलचा, टी. व्ही. चा) प्रयोग करु नका. वर्तमानपत्र वाचू नका. टी. व्ही पाहू नका. फक्त मनाला सकारात्मक उर्जेने भरायचा प्रयत्न करा.** स्वतःविषयी तसेच परिवाराविषयी श्रेष्ठ संकल्प करा जीवनात सफलतेचे आवाहन करा. आपले मन कुठे जात आहे, काय विचार करीत आहे. कोणाविषयी विचार करीत आहे, याकडे जर आपण लक्ष दिलेतर थोड्याच वेळात आपल्या आतमध्ये सकारात्मक उर्जेचा प्रवाह सुरु होतो व सफलता सुनिश्चित होते.

**प्रश्न –** एका गृहस्थाने विचारले की बऱ्याच वर्षापासून माझ्या भावाशी मालमत्तेवरुन विवाद चालू आहे. परंतु अजून तोडगा काही निघत नाही. तर मी काय करावे?

**उत्तर –** सर्वप्रथम आपल्याला हे जाणून घेतले पाहिजे की ज्यांना आपण आपले संबंधी समजतो, त्यांच्याशी आपला पूर्व जन्माचा 'हिसाब-किताब' (देणं-घेणं) आहे. मी कुणाचे कर्ज घेऊन आलो असेल तर या जन्मी मला ते परत करावे लागेल. तसेच मी जर कुणाला पूर्वजन्मात उधार दिले असेल तर तो मला अवश्य परत करेल. कर्माचा हा अटळ सिद्धांत आहे त्यामुळे कधीही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करु

नका. सामंजस्यपूर्वक विचार विनिमय करुन कुठलाही विवाद सोडवला पाहिजे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे समय सर्वात मोठी औषधी आहे. समयानुसार माणसाला याची जाणीव होते की संपत्तीपेक्षा मनाची शांती व पारिवारिक स्नेह अधिक महत्त्वाचा आहे. त्यामुळे हळू-हळू सर्व काही ठीक होईल.

**प्रश्न** – एका मातेने विचारलं. माझा मुलगा फारच खोडकर आहे, माझं काहीच ऐकत नाही, अभ्यासाकडे लक्ष देत नाही. यावर उपाय काय?

**उत्तर** – आजचे वातावरण फारच नकारात्मक आहे. सगळीकडे धोकेबाजी, खोटं-नाटं, मारामारीचे वातावरण आहे. टी.व्ही असो वा मोबाईल- सर्वत्र अधिक तर वाईट गोष्टीच प्रसारित केल्या जातात. अशा वातावरणाचा प्रभाव मुलांवर अधिक पडतो. मुले जेव्हा अशा गोष्टी बघतात तेव्हा त्यांना त्या खऱ्या वाटतात. त्यामुळे आपल्या जीवनातही त्या असाव्यात असे त्यांना वाटू लागते. अशा परिस्थितीत मुलांना योग्य ते मार्गदर्शन करणे, ही माता-पित्याची महत्त्वाची भूमिका आहे. त्यासाठी मुलांना प्रेरणादायक गोष्टी सांगा. आदर्श व्यक्तींची जीवन कहाणी सांगा. **मुख्य म्हणजे आपल्या जीवनात प्रेम (लव) व कायदा (लॉ) यांचे संतुलन बाळगा. मुलांचे मोठ्या प्रेमाने संगोपन करा. परंतु अभ्यासाच्या बाबतीत कुठलीही बहाणेबाजी ऐकून घेऊ नका.** अभ्यासाबरोबरच त्याच्यावर चांगले संस्कार कसे होतील, याकडे विशेष लक्ष द्या. कारण लहान मुलांचे मन संस्कारक्षम असते.

**प्रश्न** – एका कुमारीने विचारले, मी माझ्या जीवनात अगदी वैतागून गेली आहे. मी काय करावे, हे सूचत नाही. कुठलाही रस्ता दिसत नाही. कधी कधी तर जीवघात करावासा वाटतो. अशा परिस्थितीत मी काय करु?

**उत्तर** – जीवघात, महापाप आहे. आपण कुणाला जीवन देऊ शकत नाही. तसेच जीवघात करण्याचा अधिकार सुद्धा आपल्याला नाही. जीवघात करणे म्हणजे एक प्रकारचा जीवनातून पलाथनवाद आहे. अशा मनस्थितीत पुढीलप्रकारचे चिंतन करा. ''आधीपासूनच माझ्या डोक्यावर पापकर्मांचे फार मोठे ओझे आहे, जे समस्यांच्या रुपाने आज माझ्यापुढे आले आहे. या समस्येला तोंड देण्याऐवजी मी जर जीवघात केला तर पापांचे ओझे अधिकच वाढेल. परिणामतः पुढील जन्मात अधिक दुःख भोगावे लागेल. त्यामुळे प्राप्त परिस्थितीला न घाबरता धीराने तोंड देणें, हेच माझे कर्तव्य आहे.'' संकटांवर मात करुन, विजयी बनणाऱ्यांचाच इतिहास लिहिला जातो. त्यामुळे जीवघात करण्याच्या निकृष्ट कर्माचा कधीही विचार करु नका.

**प्रश्न** –एका युवा आय.टी. इंजिनियरने विचारले - इंटरनेट बदं पडले की मला एकदम विचित्र वाटते. मनात प्रश्न उत्पन्न होतो की आता काय होईल? कोणाशीच काही बोलवेसे वाटत नाही. अशावेळी मी काय केल पाहिजे?

**उत्तर** – आपल्याला साधनांचे गुलाम न होता, त्याचा मालक बनून उपयोग करता आला पाहिजे. ब्रह्माकुमारी आश्रमात राहून विज्ञानाच्या सर्व साधनांचा उपयोग आम्ही आमची साधना वाढविण्यासाठी करतो. तुम्ही ही तसा उपयोग करु शकता.

आज इंटरनेट जीवनातील आवश्यक शक्ती बनली आहे. त्याद्वोर अनेक कामे अत्यंत सहजपणे व शीघ्रतेने केली जातात. याचा लाभ अवश्य घ्या परंतु त्याबरोबर आपली कार्यक्षमता सुद्धा वाढवा. कधीही विचार करु नका की इंटरनेट नाही म्हणजे सारा खेळच संपला. आज बऱ्याच जणांना असे वाटते की इंटरनेट बंद झालं म्हणेज जणू जगच थांबलं. त्यांना एकदम एकाकी वाटायलं लागतं. अशा प्रकारची निर्भरता घातक आहे. **ज्यावेळी इंटरनेट बंद होतं त्यावेळी आपले आंतरिक इंटरनेट चालू करा. अर्थात स्वतःशी व परमात्मा शिव पित्याशी वार्तालाप करा. ईश्वराकडे आपल्या सर्व समस्यांचे समाधान आहे बस, त्याच्याशी आपल्या मन बुद्धीची तार जोडून तर पहा. तुम्हला एका क्षणात खुशीचा अनुभव होईल.**

**प्रश्न** – एका युवतीने विचारे की धर्म व अध्यात्म यात कोणते अंतर आहे?

**उत्तर** – धर्म या शब्दाचा वास्तविक

भावार्थ आहे- धारणा. परंतु आज संपूर्ण संसार धर्माच्या नावाखाली विभागला गेला आहे. कोणी म्हणतो- माझा धर्म महान आहे. कोणी म्हणतो माझा धर्म सर्वात श्रेष्ठ आहे, कोणी म्हणतो- माझा धर्म सर्वात प्राचीन आहे. याउलट अध्यात्म आपल्याला वास्तविकतेशी परिचित करुन देतं. आपण देह नसून, आत्मा आहोत व एक परमात्मा पित्याची मुले आपापसात भाऊ-भाऊ आहोत. याची जाणीव करुन देतं. अध्यात्म आपल्याला जीवन जगण्याची कला शिकवतं. अध्यात्माद्वारे जीवनात दिव्य गुणांची धारणा होते कित्येक लोक असे मानतात की अध्यात्म म्हणजे घर-परिवाराचा त्याग, समाज-संसाराचा त्याग, परंतु हे सत्य नाही. घर गृहस्थमध्ये राहून स्वतःला ट्रस्टी (विश्वस्त) समजून, कार्य व्यवहाराला परमात्म्याची ठेव (अमानत) समजून करणे, हेच खऱ्या अर्थी अध्यात्म होय.

**प्रश्न –** एका प्रौढ महिलेने विचारले की आजकाल भूत - प्रेताचा प्रकार फारच वाढत चालला आहे. अतृप्त आत्म्यांचा अटॅक (वार) जिथे-तिथे होत आहे. मी जेव्हा हे समाचार ऐकते तेव्हा मन अतिशय भीतीग्रस्त होते. यावर काही उपाय आहे का?

**उत्तर –** हा कलियुगाचा अंतिम समय आहे. बरेच आत्मे असमयी शरीर सोडत आहेत. त्यांनी जुने शरीर तर सोडले परंतु त्यांच्यासाठी नवीन शरीर मात्र तयार नाही. म्हणून असे आत्मे भटकत रहातात व ज्या व्यक्ती कमजोर असतात त्यांच्यावर अटॅक करतात अशा अनेक घटना आजकाल पहायला मिळतात.

जसे डॉक्टर म्हणतात की शरीरातील रोग प्रतीबंधक शक्ती कमी झाली की रोग लवकर होतात. तसेच आत्म्याची प्रतिरोधक शक्ती (इम्युनिटी) कमजोर झाल्याने भय वाटणे, अनिद्रा, तणावात राहणे, सदैव कुठल्यातरी गोष्टीवर विचार करत राहणे इत्यादी रोग वाढत जातात. **या सर्वांच्या मागे एकच कारण आहे, आत्म्याची निर्बलता व दुर्बलता. ती दूर करण्यासाठी आत्म्याचे सशक्तीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी नियमित राजयोगाचा अभ्यास करा.** म्हणजे आत्मबल वा मनोबल वाढेल. परिणामस्वरुप भूतप्रेताच्या भीतीपासून मुक्त व्हाल.

**प्रश्न –** एका व्यक्तीने विचारले - मी हनुमानजींची पूजा करतो. परंतु आपण वारंवार सांगितले की शिव भगवंताची आठवण करा. आपले म्हणणे ऐकून मी जर भगवान शिवाचा उपसाक बनलो तर हनुमानजी माझ्यावर नाराज होणार नाहीत का?

**उत्तर –** कोणत्याही धर्मशास्त्रात परमात्मे असा शब्द प्रयोग नाही. असेच म्हटले जाते की सर्वांचा मालक एक आहे. परंतु आपल्याला ईश्वर व देवता यातील अंतर समजून घेणे आवश्यक आहे. भगवान शिव सर्वोच्च सत्ता आहे, तो सर्वोपरि आहे, तो मुनुष्य सृष्टीचा पिता आहे. मुख्य म्हणजे तो निराकार आहे. देवतांची महिमा ही मात्र भिन्न आहे. आज मनुष्य हनुमानजींची भक्ती करतो. त्यांच्याकडे सुख-शांतीची कामना करतो. परंतु आपण जाणतो की हनुमानजी श्रीरामाचे उपासक होते व श्रीरामजींने रामेश्वरमध्ये शिवाची आराधना केली. आता हे जाणण्याची आवश्यकता आहे. की शेवटी शक्तीचा केंद्रबिंदु कोण आहे? **तुम्ही जेव्हा कुणा माध्यमामार्फत जाल तेव्हा तुम्हाला थोडीशी प्राप्ती होईल. परंतु जर तुम्ही परमपिता शिव परमात्म्याशी थेट जोडले जाल तर मात्र संपूर्ण संपत्तीचे अधिकारी बनाल. त्यामुळे तुम्ही जर मनापासून एक पिता परमात्म्याचे चिंतन कराल तर सर्व देवीदेवता तुमच्यावर प्रसन्न होतील व तुमचे घर खुशीने भरपूर होईल.**

**प्रश्न –** माझा एक मित्र काही काळापासून माझ्यापुढे जात आहे. त्याला खूप मान-सन्मान प्राप्त होत आहे . ही गोष्ट मात्र मला सहन होत नाही. त्यामुळे त्याच्याविषयी मनात घृणा व ईर्ष्या भाव असतो. तर मी काय करु?

**उत्तर –** आपल्याला या विश्वनाटकाला बेहद दृष्टीने पहाण्याची आवश्यकता आहे. डॉक्टर सांगतात की या जगातील कोणाचाच डी.एन.ए. एकसारखा नाही. एवढंच नव्हे तर सर्वांच्या बोटांचे निशाण हे सुद्धा सारखे नाहीत. विविधता हीच या बेहद नाटकाची विशेषता आहे. म्हणून दुसऱ्यामध्ये कोणती विशेषता आहे ज्यामुळे तो पुढे जात आहे. हे

आधी समजून घ्या. ती विशेषता स्वतः धारण कराण्याचा प्रयत्न करा. म्हणजे तुमचाही उत्कर्ष होत जाईल. याउलट जर तुम्ही दुसऱ्याची केवळ ईर्ष्या करत बसलात तर तुमच्या जीवनातील खुशी नाहीशी होईल. **त्यामुळे प्रत्येक व्यक्तीविषयी सदैव शुभभावना ठेवल्याने आपलेही कल्याण होत जाईल. 'मी ही प्रगती करत राहिल, दुसऱ्यांनी ही प्रगती करत रहावे' हाच आपल्या जीवनाचा उद्देश्य असावा.**

**प्रश्न –** एका कंपनीच्या मॅनेजरने विचारले – कंपनीतील लोक काम करण्यासाठी टाळाटाळ करतात. कंपनीचा मालक माझ्यावर असंतुष्ट असतो. यावर काही उपाय आहे का?

**उत्तर –** आधी आपल्याला हे जाणून घेतलं पाहिजे की लोक असे का वागतात? ते व्यवस्थापनाविषयी असंतुष्ट तर नाहीत ना? त्यांच्या काही पारिवारिक समस्या आहेत का? त्यांना बाहेरची कुठली संघटना भडकावत आहे का? सध्याच्या अनिश्चिततेच्या काळात कोणीही मनुष्य असा विचार करणार नाही की आपण बेरोजगार व्हावे. कारण आजकाल एकदा का नोकरी गेली की दुसरी नवीन नोकरी मिळवणं अतिशय कठीण गोष्ट आहे. तसेच बहुतांश लोक आजही मेहनती, ईमानदार आणि विश्वासपात्र आहेत. त्यामुळे सर्वप्रथम हे शोधून काढले पाहिजे की कंपनीत अराजकतेचे वातावरण कोण पसरवित आहे. अशा लोकांशी पर्सनल संवाद साधला पाहिजे. ते जर सामोपचाराने ऐकत नसतील तर त्यांना कायद्याचा धाक दाखवला पाहिजे. त्याचबरोबर दुसरे जे लोक चांगले आहेत त्यांचे मन जिंकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्यासाठी काही कल्याणकारी योजना अंमलात आणल्या पाहिजेत. **शक्य असल्यास कंपनी परिसरात एक 'मेडिटेशन कक्ष' बनवायला पाहिजे, जेथे प्रत्येक व्यक्ती कामाला सुरुवात करण्यापूर्वी थोडावेळ जाऊन बसू शकेल. उर्जा ग्रहण करु शकेल व ताजेतवाने होऊन दिवसभर काम करु शकेल. परिणामतः कंपनीचे वातवरण लवकरच बदलेल.** ***

---

## दिवाळी करावी अशी साजरी

**हीच सणाची रीत खरी, दिवाळी करावी अशी साजरी ।।धृ।**
**विझणाऱ्या पणत्यांनी करिशी, दीपोत्सव साजरा ।**
**आज चेतवी आत्मा दीपक, कधीच न विझणारा ।**
**जीवन उजळूनी घे सत्वरी, दिवाळी करावी अशी साजरी ।।१।।**
**घाण घरातील तिमिर मनातील, दूर कराया सारे ।**
**इमारतीसह तना, मनाच्या, उघडी खिडक्या दारे ।**
**तरीच लक्ष्मी येई घरी, दिवाळी करावी अशी साजरी ।।२।।**
**दैवीगुणांचे आभूषण हे, सर्वांगावर ल्यावे ।**
**पक्कांनाहूनी मधाळ वाणी, मधुर मनही व्हावे ।**
**हेच विसरला आजवरी, दिवाळी करावी अशी साजरी ।।३।।**
**नष्ट करावी आता सारी, दुष्कर्मांची खाती ।**
**भाऊबीजेला विजयी तिलक, लावी भागिनी हाती ।**
**सौभाग्यशाली भाळावरी, दिवाळी करावी अशी साजरी ।।४।।**

(संदर्भ : दिवंगत ब्र. कु. गौतम सुत्रावे यांचा काव्य संग्रह 'ज्ञानसुधा ही शिवबाबांची')

(भाग–१)

# कर्म अधिक श्रेष्ठ की भाग्य अधिक श्रेष्ठ?




ब्र. कु. जगदीश दीक्षित, पुणे

ज्या ज्ञानसंपन्न आत्म्याने कर्म व कर्मफल अथवा कर्माच्या आधारावर मनुष्याला प्राप्त होणारे भाग्य ह्याचा अभ्यास केला आहे त्याच्या मुखाद्वारे ह्या प्रश्नाचे उत्तर हेच येईल की, 'भाग्यापेक्षाही अधिक श्रेष्ठ आहे ते त्या भाग्याला प्राप्त करण्यासाठी केलेले कर्म!' **कर्म हे बीज आहे तर त्या बीजाचे फळ आहे भाग्य! विचार करा ज्याच्या आधारावर भाग्य निर्माण होते तो आधार अधिक महत्त्वाचा नाही काय?** आपल्या सर्वांच्या जन्माचा आधार आपले आई-वडिल असतात. अर्थात येथे आधार मोठा असल्याने आपण आपल्या जन्मदात्या आईवडिलांना मोठे मानून त्यांच्या पुढे नतमस्तक होतो. कोणाचा जन्म श्रीमंत घराण्यात होतो तर कोणाचा जन्म गरीब घराण्यात होतो. श्रीमंत व उच्च घराण्यात जन्म घेण्याचे भाग्य प्राप्त होण्याचा आधार आहे, पूर्व जन्मात केलेली सुकर्मे! त्यासाठी आपण सर्वश्रेष्ठ भाग्य प्राप्त झालेल्या नरश्रेष्ठ श्रीकृष्णाचे उदाहरण घेऊया. केवळ ब्रह्मावत्सांनाच हे ज्ञात आहे की, श्रीकृष्णाच्या आत्म्याचा अंतिम व अलौकिक जन्म कलियुगाच्या अंतिम चरणात होतो. अतिधर्मग्लानी समयी निराकार परमात्मा साकार रूप धारण करण्या अर्थ त्याच्या ८३ व्या जन्म असलेल्या साधारण वृद्ध तनात प्रवेश करतो अर्थात आपल्या परमधामातून तो अवतरित होतो. त्या साधारण वृद्ध तनाला तो अलौकिक नाव देतो 'प्रजापिता ब्रह्मा' अर्थात पिताश्री ब्रह्माबाबा. हा श्रीकृष्णाच्या आत्म्याचा ८४ वा दिव्य व अलौकिक जन्म होय! **ह्या दिव्य जन्मात ब्रह्माबाबा राजयोगाद्वारे आत्म्याला संपूर्ण पावन तर करतातच; ह्या शिवाय श्रीमतानुसार श्रेष्ठ कर्म करून, अल्पावधीत स्थापन होणाऱ्या सत्ययुगी स्वर्गात पुनः श्रीकृष्णाचा श्रेष्ठ जन्म घेण्याचे भाग्य प्राप्त करतात.** ह्या उदाहरणावरून निष्कर्ष हाच निघतो की, मनुष्यात्म्याला कोणत्या घराण्यात पुनर्जन्म घेण्याचे भाग्य प्राप्त होणार आहे हे त्याच्या पूर्वजन्माच्या भिन्न-भिन्न कर्मावरच आधारित आहे. आणि म्हणून 'भाग्यापेक्षाही तत्पूर्वी केलेले कर्म अधिक श्रेष्ठ आहे' असे म्हणणे यथार्थ आहे.

आपल्या समाजात कोणाला डॉक्टर, कोणाला वकील तर कोणाला इंजिनियर व्हायचे असते अर्थात त्यासाठी प्रथमतः परिक्षा देण्याचे कर्म करणे अपरिहार्य असते. मेडिकल अथवा इंजिनियरिंगला प्रवेश मिळविण्यासाठी बारावीला उत्तम मार्क्स पडणे आवश्यक असते. अर्थात उत्तम मार्कांसाठी उत्तम अभ्यासाचे कर्म करणे, अपरिहार्य असते. कर्माशिवाय केवळ भाग्याचाच विचार करणे म्हणजे पायाशिवाय इमारत बांधण्यासारखे आहे. एखाद्या भविष्यकाराने कोणा मनुष्याला असे सांगितले की, 'तुम्हाला अल्पावधीतच मोठे राजकीय पद प्राप्त होणार आहे.' परंतु त्या मनुष्याने त्यासाठी काहीच कर्म केले नाही तर तो कधीच आमदार, खासदार अथवा मंत्री होऊ शकणार नाही. म्हणून सर्वसामान्य माणसेही सांगतात की, 'दे रे हरी खाटल्यावरी, असे होत नाही.' चतुर्भुज श्री विष्णुच्या साक्षात्काराद्वारे ब्रह्माबाबांनी हे जाणले होते की, 'मज आत्म्याचे सत्ययुगातील पहिले विश्वमहाराजन पद निश्चित आहे' त्याच बरोबर त्यांनी हे देखील जाणले होते की, अशा महान देवत्य पदाच्या प्राप्तीसाठी करावा लागणारा महान पुरुषार्थ अर्थात महान कर्म ही निश्चित आहे. भाग्यविधाता परमात्मा केवळ कृपाशिर्वादाने कोणालाही भाग्य प्रदान करु शकत नाही. म्हणून भगवद् गीतेतही

भिन्न-भिन्न कर्मांची भिन्न-भिन्न गती स्पष्ट केली आहे. परमात्मा भाग्य प्रदान करण्याची कृपा करीत नसून, श्रेष्ठ भाग्य प्राप्त होण्यासाठी कोणती कर्मे करावयाची व कोणती नाहीत ह्याचे ज्ञान देण्याची कृपा करतो. परंतु भाग्य प्राप्त करण्याचे कर्म तर मनुष्यात्म्यांना करावेच लागते. म्हणून म्हटले आहे 'नर ऐसी करणी करे जो नर से नारायण बन जाय!' ही करणी अर्थात कर्मे साधारण निश्चितच नाहीत. त्यासाठी परमात्मा श्रेष्ठ कर्मांची गती स्पष्ट करतो. बंधुनो, द्वापर-कलियुगात पाच मनोविकारांचा त्याग व पुण्यकर्मे जमा करून मनुष्य आत्मा संत, महात्मा, धर्मात्मा, ऋषी मुनी अर्थात पुण्यात्मा बनू शकतो परंतु **नरापासून नारायण बनण्याची अति दुर्लभ सुवर्णसंधी ५००० वर्षांच्या कल्पात केवळ संगमयुगावरच प्राप्त होऊ शकते. ह्याचे एकमात्र कारण हेच आहे की, मनुष्यात्म्याला देवत्वपद प्राप्त करवून देण्याचा अधिकार केवळ सर्वशक्तिवान परमात्म्याचाच आहे.** संगमयुगावरील ह्या एका अलौकिक व दुर्लभ जन्मात मनुष्यात्मा कर्मरूपी पायावर २१ जन्मांच्या दैवी भाग्याची उत्तुंग इमारत उभी करु शकतो. म्हणून ह्या युगावरील ब्रह्मावत्सांच्या कर्मांना असाधारण महत्व आहे. **कोणतेही भाग्य प्राप्त करावयाचे असेल तर त्यासाठी करावी लागणारी कर्मे भाग्यापेक्षा अधिक महत्त्वाची आहेत कारण कर्म भाग्याचा रचयिता आहे तर भाग्य कर्माची रचना आहे! निःसंशय रचयिता रचनेपेक्षा सदा श्रेष्ठ व महानच असतो.**

काही भाग्यशाली मनुष्यात्म्यांना वडिलोपार्जित मोठी संपत्ती विनाप्रयास प्राप्त होताना दिसते. त्यांच्या ह्या प्राप्तिकडे पहाण्याची सर्वसामान्यांची दृष्टी वर्तमानाशी निगडीत असल्याने सदरहू मनुष्यात्म्यांना प्राप्त होणारी संपत्ती विनाप्रयास अर्थात कोणतेही विशेष कर्म न करता प्राप्त झाली आहे असे वाटणे सहाजिक आहे. परंतु ह्या विनाप्रयास प्राप्त झालेल्या आर्थिक संपत्तीचा संबंध वर्तमान जन्माबरोबरच पूर्वजन्माशीही असतो. ह्या जन्मात व पूर्वजन्मात तुम्ही संबंध संपर्कात येणाऱ्या मनुष्यात्म्यांना किती सुख दिले तद्वतच निर्वैर स्थितीत राहून अन्य आत्म्यांच्याकडून किती शुभभावना, शुभकामना व आशीर्वाद प्राप्त केलेत ह्यावरही वर्तमान जन्माचे भाग्य निर्धारित असते. सर्वसामान्य माणसे श्रीकृष्णाच्या श्रेष्ठ व दैवी जन्माला सहज जाणतात परंतु असा श्रेष्ठ जन्म प्राप्त होण्यासाठी त्याने पूर्वजन्मात कोणता पुरुषार्थ केला ह्या विषयी ते अनभिज्ञ आहेत. **असे दैवी भाग्य कसे प्राप्त करावयाचे ह्याचा आदर्श श्रीकृष्ण नसून, त्याचा पूर्वजन्म 'प्रजापिता ब्रह्मा' आहे. आणि म्हणून ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी श्रीकृष्णाचे अनुकरण करीत नसून, पिताश्री ब्रह्माबाबांचे अनुकरण करीत आहेत. लक्षावधी ब्रह्मावत्सांनी ब्रह्माबाबांच्याप्रमाणे कर्मे केल्याने भारतात देवी-देवतांचे सुखशांती संपन्न सत्ययुगी दैवी स्वराज्य स्थापन होते.** येथूनच भारताचा संपूर्ण अहिंसक व सर्वोच्च भाग्यशाली सुवर्ण इतिहास आरंभ होतो. आरंभीच्या ह्या इतिहासाचे साक्षीदार अत्यल्प मनुष्यात्मेच असतात. सत्ययुगाच्या आरंभी केवळ नऊ लाख दैवी जनसंख्या असते. (उर्वरित सर्व आत्मे हे परमधाममध्ये मुक्तीच्या अवस्थेत असतात.) अशा श्रेष्ठ भाग्यशाली व संपूर्ण पावन असलेल्या देवी-देवतांचे आत्मेच ८४ जन्म घेतात. व त्याचबरोबर सतो-रजो-तमोच्या (सतोप्रधान - संपूर्ण निर्विकारी, रजोप्रधान - अत्यल्प विकारी, तमोप्रधान - संपूर्ण विकारी) चक्रात येऊन कलियुगाच्या अंताला पूर्णतः पतित, कनिष्ठ व दुर्भाग्यशाली बनतात. परंतु भाग्यविधाता परमात्मा त्यांना कल्प कल्प (प्रत्येक ५००० वर्षांनी) पद्मापद्म भाग्यशाली बनवितो. बंधुनो, स्वर्गीय भाग्य असो अथवा नरकीय दुर्भाग्य असो, दोन्हीचा आधार कर्मच आहे. दुष्कर्मांच्या द्वारे दुर्भाग्य कसे प्राप्त होते, ह्याचा विचार करण्याचा हा समय नव्हे. परंतु वर्तमान समय आहे श्रेष्ठ कर्म करून श्रेष्ठ युगाचे भाग्य प्राप्त करण्याचा. त्यासाठी अत्यल्प समय बाकी आहे. आपण ह्या समयाला मूल्य द्याल तर हाच समय आपल्याला मौल्यवान असे देवत्वपद प्राप्त करवून देईल. ह्या समयाला दुर्लक्षित कराल तर अंतिम समयी पश्चाताप करावा लागेल.

**क्रमशः**



# सब सौंप दो, प्यारे प्रभुको...

## (अनुभव)

ब्र. कु. वसंत निंबाळकर, कागल (कोल्हापूर)

जानेवारी २००४ मध्ये कागल सेवाकेंद्रावर मी व माझ्या युगलने साप्ताहिक कोर्स पूर्ण केला. त्यानंतर शाहू कॉलनीतील गीता पाठशाळेत आम्ही दोघेही नियमितपणे मुरली ऐकायला जात आहोत. मागील १४ वर्षाच्या कालखंडात शिवबाबांच्या मदतीचे अनेक अनुभव आले. **संगमयुगात शिवबाबा प्रत्येक ब्रह्मावत्साला कशी पालना देतात, हे आपण सर्व जण जाणताच, त्याचेच वर्णन भक्तिमार्गात भागवत ग्रंथातून रूपकात्मक रीतीने करण्यात आले आहे.** प्रस्तुत लेखात मी निवडक अनुभव आपल्यापुढे मांडणार आहे.

माझी युगल (सौ. लक्ष्मी) काही दिवसापूर्वी पोटाच्या त्रासाने बेजार झाली होती. त्यावर फॅमिली डॉक्टरकडून ट्रीटमेंट घेण्यात आली. परंतु बरे न वाटल्याने, पोट विकाराचे तज्ज्ञ डॉ. कौस्तुभ मेंच यांना दाखविण्यात आले. त्यांनी सोनोग्राफी करायला सांगितली. त्यानंतर आलेला रिपोर्ट पाहून अपेंडिक्सचा त्रास असल्याने, ऑपरेशन करण्याचा निर्णय त्यांनी दिला. माझी युगल ही हार्ट पेशंट असल्याने, वेळेवर भूल न उतरल्यास जीवास धोका संभवत होता. त्यामुळे हृदयरोग तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार हार्ट पम्पिंग स्पीड चेक करण्यात आले. ते ५०% असल्याने ऑपरेशनसाठी चालणार होते. परंतु डॉ. मेंच यांना ऑपरेशन बाबत अजूनही खात्री वाटेना. त्यामुळे आमचा जीव मात्र टांगणीला लागला होता.

दरम्यानच्या काळात खोकल्याचीही साथ सुरु झाली. युगलचा घसा आतून लाल झाल्यामुळे दुखत होता. त्यामुळे तिला मुरली वाचता येत नव्हती. तशा परिस्थितीत दोन दिवस गेले. युगलला मात्र मुरलीशिवाय चैन पडत नव्हती. तिसऱ्या दिवशी तिने निश्चय केला की घसा कितीही दुखला तरी मुरली वाचायचीच आणि शिवबाबा मुरलीतून ऑपरेशनबाबत काय निर्णय देतात, ते पहायचे. त्यादिवशी मुरलीत एक महावाक्य होते की, 'तुम सारा बोझ बाप को दे दो और निश्चिंत रहो ।' हे वाचल्यावर युगलच्या मनावरचा ताण एकदम नाहिसा झाला. ती मला म्हणाली की आपण डॉक्टरकडे फेर तपासणी करुया. नंतर संध्याकाळी आम्ही डॉ. मॅच यांच्याकडे गेलो त्यांनी फेरतपासणी केली आणि काय आश्चर्य! डॉ. म्हणाले की ऑपरेशन करावे लागणार नाही. फक्त ८ दिवस गोळ्या घ्या तसेच विश्रांती घ्या. अपेंडिक्सच्याऐवजी फक्त पाण्याची पिशवी दिसते. ती औषधाने हळूहळू कमी होईल. अशारीतीने शिवबाबांच्या मदतीने एक मोठी समस्या अगदी राई एवढी लहान झाली. आम्हा दोघांनाही शिवबाबांच्या छत्रछायेने आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. वारंवार पुढील गीताच्या ओळी मनात गुंजत होत्या -

**सब सौंप दो प्यारे प्रभुको,**
**सब सरल हो जायेगा ।**
**चिंता सभी मिट जायेगी,**
**जीवन सफल हो जायेगा ।।**

माझा स्वतःचा आणखी एक अनुभव, मी आपल्यापुढे ठेवत आहे. आम्ही सेवाधारी भाई १० वर्षापूर्वी कागल सेवाकेंद्राच्या राजश्री बहेनजींच्या नियोजनाप्रमाणे परगावी मुरली क्लास घेण्यासाठी १-१ आठवडा जात होतो. एकदा मी ५-६ कि.मी. अंतरावरील विकासवाडी गावाहून रात्री ९ वाजता मुरली क्लास घेऊन परत येत होतो. रस्त्यात कागल डेपोजवळ पुणे-बंगलोर

रोडवरचा मधला कट्टा शॉर्ट कट म्हणून तोडण्यात आला होता. मी डावीकडून उजवीकडे प्लेझर गाडीवरून उतरून, पलीकडे गाडी ढकलत रस्ता क्रॉस करीत होतो. इतक्यात मागून ६ इंच अंतरावरून एक एस.टी. बस भरधाव वेगाने निघून गेली. मला अगदी काही क्षणाचा विलंब झाला असता तर मी प्लेझर स्कूटरसह कुठल्या कुठे फेकला गेलो असतो. **त्याप्रसंगी जणू शिवबाबांनीच मला पुढे ढकलले होते. अजूनही तो प्रसंग आठवला की अंगावर शहारे येतात. लगेचच मनात हा भाव उमटतो – 'जिसका साथी है भगवान, उसे क्या करे आँधी और तुफान!'** ***

---

पान क्र. ११ वरून

**आत्मिक स्थितीत स्थित झाल्यानंतरच प्रत्येक कर्म करण्याची सवय लावून घेणे अत्यंत आवश्यक आहे. अशाप्रकारे आत्मिक स्मृतीवर अटेंशन ठेवता–ठेवता जो आत्मस्वरुप बनला, तोच खऱ्या अर्थी ज्ञानस्वरुप, योगस्वरुप, धारणास्वरुप व सेवास्वरुप होय. याउलट जे आपल्या आत्मस्वरुपाकडे पुरेसे लक्ष देत नाहीत, त्यांच्याबाबतीत 'सावधानी हटी, दुर्घटना घटी' असा प्रकार पहायला मिळतो. म्हणूनच सदा सावधान रहा व बापसमान बनण्याचे आपले अंतिम ध्येय गाठा; हेच सर्वांना कळकळीचे आवाहन!**

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जसा संगणक नीट चालावा **यासाठी ए.सी. मध्ये ठेवला जातो. तसाच आत्मारुपी, संगणक नीट चालावा, यासाठी ए.सी. मध्ये ठेवा. यातील 'ए' अर्थात अंतर्मुखता व 'सी' अर्थात चेकींग. दिवसाभरात शक्यतो अंतर्मुखी रहा व अधून–मधून आपल्या पाचही मुखाचे चेकींग करण्याकडे अटेंशन द्या. फलस्वरुप आपली स्थिति पाहता–पाहता बापसमान अवश्य बनेल.** ***

---

पान क्र. १६ वरून

**म्हणूनच त्यांनी 'नेति–नेति' (आम्ही जाणत नाही) असे स्पष्ट सांगितले.** यावरून आपल्या लक्षात येईल की कलियुगाचे अंती जेव्हा ज्ञानसागर सद्‌गुरु शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण साकार ब्रह्मा तनात होते. तेव्हाच आपल्याला रचयिता व रचनेच्या आदि-मध्य-अंताचे सत्य ज्ञान प्राप्त होते. तसेच या सत्य ज्ञानाद्वारेच आपली सर्वांची सद्‌गती होते. म्हणूनच सद्‌गुरु एक शिव परमात्माच आहे, असे म्हटले जाते.

भक्तिमार्गात गुरु अनेक असतात. जे भक्ती शिकवितात. परंतु परमापिता शिव परमात्मा जो ज्ञानाचा सागर आहे. त्याला सद्‌गुरु म्हटले जाते. तो कधी भक्ती शिकवित नाही. तो भक्तांना भक्तीचे फळ, ज्ञान प्रदान करतो. तोच ज्ञानाचा सागर आहे, सर्वांचा सद्‌गतीदाता आहे. म्हणूनच गायन केले जाते. 'ज्ञान–अंजन सद्‌गुरु दिया, अज्ञान अंधेरा विनाश' तसेच 'सद्‌गुरु अकाल' असेही गायन केले जाते. त्यामुळे कुठल्याही मनुष्याला किंवा धर्मस्थापकाला सद्‌गुरु वा जगत्‌गुरु म्हणणे अयथार्थ आहे. **या अनुषंगाने परमात्मा शिव पित्याची पुढील महावाक्ये अतिशय उद्‌बोधक आहे "जैसे कहते है, गुरुनानक । क्राइस्ट कोई गुरु थोडे ही है । वे तो सिर्फ धर्म स्थापन करते है। उनके पिछाडी उनकी वंशावली आती रहती है। सद्‌गुरु तो एक ही है जिसको सर्व का सद्‌गतिदाता कहा जाता है। भगवान बाप ही आकर सभी की सद्‌गति करते है। मुक्ति–जीवनमुक्ति देते है। उनकी याद कब किससे छूट नही सकती।"**

यावरून आपल्या लक्षात आले असेल की साऱ्या जगताचा बाप, जगताचा शिक्षक व जगताचा गुरु एकच परमात्मा आहे. तोच पतित–पावन आहे. विश्वाचा सद्‌गतिदाता आहे. त्यामुळे श्री–श्री १०८ जगद्‌गुरु देखील तोच आहे. साऱ्या जगताला दुःखापासून मुक्त करणारा व स्वर्गीय सुख प्रदान करणारा आहे. **सारी महिमा ही एक परमात्मा शिव पित्याचीच आहे. तोच गुरुचाही गुरु, सद्‌गुरु आहे. आता त्याला ओळखा व त्याच्या श्रीमतावर चालून आपले जीवन पद्मापद्म भाग्यशाली बनवा.** ***




ब्रह्मपुरी (चंद्रपूर) – उप विभागीय अधिकारी भ्राता उमेश काळे व तहसिलदार श्री.चव्हाण यांना राखी बांधतांना ब्र. कु. कुंदा बहेन व मीनल बहेन



जेजूरी : येथील पोलिस स्टेशनच्या स्टाफला राखी बांधतांना ब्र. कु. नंदा बहेन



मीरा रोड (मुंबई) : वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री. वसंत लवदे यांना राखी बांधताना ब्र.कु. हेमा बहेन



पाचोरा : नगरपालिकेचे उपाध्यक्ष श्री शरदभाऊ पाटील व त्यांच्या धर्मपत्नी, मातेश्वरी मम्मांना श्रद्धांजली वाहतांना शेजारी ब्र. कु. मिरा बहेन व नंदा बहेन



पेठ वडगाव (कोल्हापूर) : उप नगराध्यक्ष श्री. अजय थोरात यांना रक्षासूत्र बांधतांना ब्र. कु. सुनंदा बहेन



बोपोडी (पुणे) : सहाय्यक पोलिस आयुक्त भ्राता कल्याणराव विधाते यांना राखी बांधतांना ब्र.कु. सुनिता दीदी




भांडुप : रक्षाबंधनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाषण करतांना नगरसेविका जागृती पाटील, मंचासीन ब्र.कु. लाजवंती बहेन व अन्य.



गोवा (पर्वरी) : गोव्याचे महसूल मंत्री श्री. रोहन खौंटे यांना राखी बांधतांना ब्र.कु. वनिता बहेन



पिंपरी (पुणे) : मा. खासदार भ्राता गौतम चाबुकस्वार यांना पवित्रता सूचक राखी बांधतांना ब्र.कु. सुरेखा दीदी



पुणे (रविवार पेठ) : मा. खासदार वंदना चव्हाण यांना रक्षासूत्र बांधतांना ब्र.कु. रोहिणी व शिल्पा बहेन



भिवंडी : राखी बांधल्यानंतर ग्रुप फोटोत खासदार भ्राता कपिल पाटील, नगर सेवक भ्राता संतोष शेट्टी ब्र. कु. अल्का, शिल्पा व बिंदू बहेन



चंद्रपूर : श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त आयोजित मनमोहक झांकीच्या प्रसंगी ब्र. कु. कुसुम दीदी



मालाड (मुंबई) : फिल्म दिग्दर्शक श्री. सुभाष घई यांना पावन राखी बांधताना ब्र.कु. कुंती बहेन



ठाणे (चेकनाका) : महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना रक्षासूत्र बांधतांना ब्र.कु. सरला बहेन



वणी (चंद्रपूर) : मा. खासदार हंसराज अहिर यांना राखी बांधतांना ब्र.कु कुंदा बहेन



सूरीनाम : महामहिम उप राष्ट्रपती भ्राता अश्विन अधीन यांच्याशी ज्ञानचर्चा केल्यानंतर त्यांच्या समवेत ब्र.कु. आत्मप्रकाश भाई ब्र.कु. लुईस बहेन व ब्र.कु. भोलानारायण भाई



जामनेर : जलसंपदा मंत्री नामदार गिरीश महाजन यांना रक्षासूत्र बांधतांना ब्र.कु. सुलभा बहेन.



वाशी (नवी मुंबई) : 'मोबिलिटी ऑफ माईंड' या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना राजयोगी करूणाभाई (शांतिवन) ब्र.कु. शीलादीदी, ब्र.कु. सुचिनी, भ्रांता व्यंकटेश व अन्य



अमरावती : आमदार श्री. रविभाऊ राणा यांना पावन राखी बांधतांना ब्र.कु. सीता दीदी सोबत ब्र.कु. दिपाली, डॉ. तापडीया व अन्य



पर्वरी (गोवा) : गोव्याचे गृह निर्माण मंत्री भ्राता जयेश साळगावकर यांना पवित्रता सूचक राखी बांधतांना ब्र.कु. वनिता बहेन

Registration No. : MAHMAR/2007/21914



दिल्ली : भारताचे राष्ट्रपती महामहिम रामनाथ कोविंद व त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती सविता कोविंद यांना पावन रक्षासूत्र बांधतांना ब्र.कु. पुष्पा बहेन व ब्र.कु. शोभा बहेन



दिल्ली : भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांना रक्षासूत्र बांधतांना ब्र.कु हुसेन, शेजारी ब्र.कु. सविता व फातिमा बहेन



आबू रोड (शांतिवन) : 'वैश्विक ज्ञानोदयाद्वारे स्वर्णिम युग' या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी रामेश्वरानंद महाराज, डॉ. साध्वी समप्रज्ञा, राजयोगिनी गोदावरी दीदी, ब्र.कु. मनोरमा बहेन, ब्र.कु. रामनाथ भाई व अन्य.



सी.बी.डी. बेलापूर : 'सेंट्रल रिझर्व, पोलिस फोर्स'मध्ये आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमानंतर ग्रुप फोटोत आय.जी. भ्राता राजकुमार, डी.आय.जी. भ्राता रोटेला, डी.आय.जी. राधाकृष्णन, कमांडर भ्राता सिध्दू, भ्राता हट्टी, भ्राता मिश्रा, ब्र.कु. शीला दीदी, ब्र.कु. शुभांगी, मीरा व निलम बहेन.